# गणपती विशेषांक २०२१



सनविवि, महाराष्ट्र मंडळ, बेंगळूरु

# ॥ श्री गणेशाय नमः ॥



## महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी , बेंगळूरु


माणिक पटवर्धन, अध्यक्ष


ओंकार संगोराम, उपाध्यक्ष


मंजिरी टोळ, खजिनदार


वैशाली तोरवी, सचिव


उर्मिला जाधव, सहसचिव


प्रदीप ओक, मानद उपाध्यक्ष


सुजय घोरपडकर


शशिशेखर चौगुले


समीर प्रधान


सुचित्रा खांडेकर


पुजा जोशी


स्मिता बर्वे


आरती माहुली


राजन दवंडे


ऋचिता दवंडे


बापूसाहेब शिंदे


रेवती कुलकर्णी


रुपाली पत्की


ज्योतिका पराडकर


दीपक कुलकर्णी


योगेश खांडेकर


गणेश देवळेकर

## महाराष्ट्र निवास विश्वस्त मंडळ, बेंगळूरु


अजित एदलाबादकर, अध्यक्ष


विनायक कवठेकर, उपाध्यक्ष/ खजिनदार


स्नेहा केतकर, सचिव


अभय दीक्षित, सल्लागार


संजय मईंद


ज्योती साठे


पुरुषोत्तम मुजुमदार


अनील बोकील


प्रतिभा नाकील


शिल्पा श्रीखंडे

## कार्यालय मदतनीस


आर बी हणमंते


रणजॉय माजी

## महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी , बेंगळूरु

**अध्यक्ष** माणिक पटवर्धन
**उपाध्यक्ष** ओंकार संगोराम
**खजिनदार** मंजिरी टोळ
**सचिव** वैशाली तोरवी
**सहसचिव** उर्मिला जाधव
**मानद उपाध्यक्ष** प्रदीप ओक

**सदस्य -**
सुजय घोरपडकर, शशिशेखर चौगुले, समीर प्रधान, सुचित्रा खांडेकर, पुजा जोशी, स्मिता बर्वे, आरती माहुली, राजन दवंडे, ऋचिता दवंडे, बापूसाहेब शिंदे, रेवती कुलकर्णी, रुपाली पत्की, ज्योतिका पराडकर, दीपक कुलकर्णी, योगेश खांडेकर, गणेश देवळेकर

**सल्लागार समिती**
रेखा नाईक, श्रीकांत आपटे, धनंजय जोग

## महाराष्ट्र निवास विश्वस्त मंडळ, बेंगळूरु

**अध्यक्ष:** अजित एदलाबादकर
**उपाध्यक्ष/खजिनदार** विनायक कवठेकर
**सचिव** स्नेहा केतकर
**सल्लागार** अभय दीक्षित

**सभासद** --संजय मईंद, ज्योती साठे, पुरुषोत्तम मुजुमदार, अनील बोकील, प्रतिभा नाकील, शिल्पा श्रीखंडे

**पदसिद्ध सभासद**
माणिक पटवर्धन, ओंकार संगोराम

**सनविवि संपादक:**
स्मिता बर्वे, राधिका मराठे, रेवती कुलकर्णी
**अंक सजावट व मांडणी:** आरती माहुली

**जाहिरात विभाग :** मंजिरी टोळ

**मुखपृष्ठ:** अंजली देशमुख

**कार्यालय मदतनीस:** आर बी हणमंते
रणजॉय माजी

**पत्ता:**
**२रा क्रॉस, गांधीनगर,**
**बेंगळूरु - ५६० ००९**
**दूरध्वनी - २२२८०६०९**
**ई-मेल : mmbangalore@gmail.com**
**वेबसाईट : www.mmblr.org**

### विभागीय वाचनालय व्यवस्थापन

1. आर टी नगर - राधिका मराठे - 9448305067
2. विजयनगर - मीना जावडेकर - 08023387576
   मोबाईल श्री जावडेकर - 9845202127
3. जयनगर - अलका भागवत - 9448370618
4. इंदिरानगर - भाग्यश्री कुलकर्णी - 9945056805
5. बन्नेरघट्टा रोड - ऋता दीक्षित - 9880106838
6. सर्जापूर रोड - माणिक पटवर्धन - 9886046987
7. एल अँड टी साऊथ सिटि- तारा गोपीनाथ - 9845953002
8. मल्लेश्वरम - विद्या पाध्ये - 9845049808

# अनुक्रमणिका


**संपादकीय** ............... ७

**संवाद** ............... ९

**महाराष्ट्र निवास विश्वस्त मंडळ** ............... १०

**ओढ मातीची ..... एक अनोखी मुलाखत - स्मिता बर्वे** ............... ११

**सनविवि विशेषांक पत्रलेखन स्पर्धा २०२१**

परीक्षकाचे मनोगत - श्री.व्यंकटेश देवनपल्ली ............... १७

प्रथम क्रमांक - वर्षा सबनीस ............... १८

द्वितीय क्रमांक - मानसी तांबेकर ............... २०

तृतीय क्रमांक - ऋचिता दवंडे ............... २२

**सनविवि विशेषांक विनोदी कथा स्पर्धा २०२१**

परीक्षकाचे मनोगत - श्री.व्यंकटेश देवनपल्ली ............... २४

प्रथम क्रमांक - बालचंद्र उखळकर - बनेची बनवेगिरी ............... २५

द्वितीय क्रमांक - अविनाश चिंचवडकर - माझी दीक्षितगिरी ............... ३०

**सनविवि विशेषांक मुखपृष्ठ चित्रकला स्पर्धा**

परीक्षकाचे मनोगत (मुखपृष्ठ, चारोळी, हायकू) - आरती फडके ............... ३६

प्रथम क्रमांक - अंजली देशमुख (मुखपृष्ठ) ............... १

द्वितीय क्रमांक - सुनील टाके ............... ४४

तृतीय क्रमांक - अंजना घैसास ............... ४५

(विभागून) - वैभवी शिंपी ............... ४६

**सनविवि विशेषांक चारोळी स्पर्धा**

प्रथम क्रमांक : मानसी तांबेकर ............... ३७

द्वितीय क्रमांक : स्मिता दाते ............... ३७

तृतीय क्रमांक : अंजना घैसास ............... ३८

**सनविवि विशेषांक हायकू स्पर्धा**

प्रथम क्रमांक : देवश्री ............... ३९

द्वितीय क्रमांक : मानसी तांबेकर ............... ३९

**गणपती स्तुती - रेवती कुलकर्णी** ............... ४०

**सुधाकरी अभंग रचना - रेवती कुलकर्णी** ............... ४१

**गणपतीस पत्र - रेवती कुलकर्णी** ............... ४२

**पालवी - वैशाली चौधरी** ............... ४३

# संपादकीय

**गणपती बाप्पा मोरयाऽऽऽऽ**

नमस्कार मंडळी,

सनविविचा हा गणेशोत्सव विषेशांक आपल्यासमोर सादर करताना आम्हाला विषेश आनंद होतो आहे.

अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे, ह्यावेळी प्रथमच मुखपृष्ठासाठी चित्रकला स्पर्धा ठेवली होती. गणेशाच्या वेगवेगळ्या रुपांतली अनेक चित्र आमच्याकडे आली आणि मुखपृष्ठाचा मान मिळाला.... अंजली देशमुख ह्यांच्या श्रीगणेशाला! अतिशय सुरेख चित्राबद्दल त्यांचे अभिनंदन आणि आभार!!

गणेशोत्सव विशेषांकाच्या निमित्ताने आम्ही पत्रलेखन, विनोदी कथा, चारोळी आणि हायकू लेखनाची स्पर्धा आयोजित केली होती. त्याला सभासद आणि सभासदेतर लेखक कवींकडून भरभरून प्रतिसाद मिळाला. स्पर्धेसाठी अनेक पत्र, उत्तम कथा, कविता, हायकू आणि चारोळ्या आमच्याकडे आल्या.

पत्रलेखन आणि कथालेखन स्पर्धेच्या परीक्षणासाठी
श्री. व्यंकटेश देवनपल्ली यांना आमंत्रित केले होते, तर आरती फडके ह्यांनी चारोळी, हायकू आणि चित्रांच्या परीक्षणाची जबाबदारी स्वीकारली.
आम्ही विचारताक्षणी दोघांनीही परिक्षण करण्याचे कबूल करून महाराष्ट्र मंडळावरील स्नेहाची पावती दिली!
वेळात वेळ काढून परीक्षण केल्याबद्दल ह्या दोघांचे खूप खूप आभार!!!

त्याच बरोबर सर्व स्पर्धकांचे मनःपूर्वक आभार!

बक्षिसपात्र पत्र, कथा, चारोळ्या आणि हायकूंचा समावेश ह्या अंकात केलेला आहे.

कोरोनासारख्या संकटाला तोंड देत आपल्या मंडळाने ह्यावर्षीचा गणेशोत्सव मोठ्या दणक्यात पण ऑनलाईन करायचा ठरवला आहे. आपल्या टेक् सॅव्ही कार्यकर्त्यांनी हे शिवधनुष्य उत्तमरितीने पेलले आहे. सगळ्या बेंगळुरवासीयांनी त्याला उत्तम प्रतिसाद दिला आहे.

ह्यावर्षी सुद्धा आपण सर्वजण आपले गणेशोत्सव विषेश कार्यक्रम ऑनलाईन बघणार आहोत. भविष्यातही असे अनेक कार्यक्रम आणि नवीन नवीन संकल्पना घेऊन आपल्या “सनविवि“ ला अधिक आकर्षक स्वरूपात सादर करण्याचा मानस आहे. वर्षातून तीनचार विशेषांक काढण्याचाही विचार आहे. त्यासाठी आपले विविध विषयांवरचे लेख, कथा, कविता, हायकू ह्यांचे स्वागत आहे.
पुन्हा एकदा आपले वर्गणीदार, जाहिरातदार, कार्यकर्ते यांचे मनापासून आभार!

आपली स्नेहांकित,
रेवती कुलकर्णी
सनविवि टीम



# संवाद

**आदरणीय सभासद**

सस्नेह नमस्कार,

महाराष्ट्र मंडळ बेंगळूरुचे एकशे एकावे वर्ष सुरु आहे. सध्याची पॅनडेमिकची परिस्थिती पाहता, सगळेच अनिश्चित आहे. तरी मंडळाने एकशे एकाव्या वर्षापासून सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरीने सामाजिक कार्य सुद्धा तेवढ्याच जोमाने करायचे ठरवले आहे.
गेल्या चार पाच महिन्यात, महाराष्ट्र दिन, पर्यावरण दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा, घरात कचऱ्यापासून खत बनवण्याची स्पर्धा असे अनेक कार्यक्रम झाले.
या वर्षी ठरवल्याप्रमाणे मंडळाकडून काही समाज उपयोगी उपक्रम यशस्वीरित्या पार पडले हे सांगताना खूप आनंद होतो आहे.
त्यात पहिला उपक्रम होता १०० गरजू लोकांना लसीकरण करण्याचा. लस कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने, ज्यांना पैसे देऊन लस घेणे परवडणार नव्हते अश्या १०६ लोकांना मंडळातर्फे लसीकरण करण्यात आले. ह्याला मंडळाच्या कमिटीच्या सर्व सभासदांनी भरघोस आर्थिक मदत केल्याने हे शक्य झाले. त्यांचे व आर्थिक सहाय्य केलेल्या सर्वांचे मनापासून आभार.
पुढे लगेच जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील अनेक गावांना जो तडाखा बसला त्यामुळे प्रचंड नुकसान झाले. अशा पूरग्रस्तांना बेंगळूरच्या अनेक मराठी बांधवांनी केलेल्या भरघोस मदतीमुळे अगदी दोनच दिवसात, १८९ अत्यावश्यक सामुग्रींचे डबे, पूरग्रस्तांपर्यंत पोचवता आले ही अत्यंत समाधानकारक बाब ठरली.

तसेच १५ ऑगस्टला काही कोरोना योद्ध्यांचा सन्मान केला. कोरोना वॉर्डात काम करणाऱ्या नर्सेस, वॉर्डबॉईज, आया ह्यांचे कितीही उपकार मानले तरी कमीच आहेत.
सध्या डिजिटल माध्यम सोईस्कर असून अनेक लोकांपर्यंत पोचणे सुलभ झाले असल्याची प्रचिती नुकतीच आली. मंडळाचा टेलिग्राम समूह सुरु केल्यापासून चोवीस तासात १२०० हून अधिक सदस्य त्यात सामील झाले ही खरोखरी उत्साह वाढवणारी गोष्ट आहे.

आता आपण सर्वजण मिळून यंदाचा ऑनलाईन गणेशोत्सव उत्तमोत्तम कार्यक्रमांनी साजरा करीत आहोत. हे सर्व आपल्या सर्वांच्या मदतीने शक्य झाले, यांत शंका नाही.
सर्व देणगीदार, जाहिरातदार आणि सभासदांचे मी मनापासून आभार मानते.
आपल्या सर्वांचा मंडळावर लोभ आहेच, तो वृद्धिंगत व्हावा आणि सर्वजण महामारीच्या सद्य परिस्थितीतून लवकरात लवकर बाहेर यावेत ही गजानन चरणी प्रार्थना !!

**माणिक अजय पटवर्धन**

**अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ , बेंगळूरु**

# महाराष्ट्र निवास विश्वस्त मंडळ

नमस्कार!

2019 सालच्या ऑक्टोबर महिन्यामध्ये महाराष्ट्र निवास ट्रस्टची नवीन कार्यकारिणी कार्यरत झाली व मी तेव्हापासून ट्रस्टचा अध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळला. महाराष्ट्र मंडळाच्या शताब्दी सोहोळ्यासाठी ट्रस्टच्या इमारतीचे आधुनिकीकरण करणे जरुरीचे होते. त्याप्रमाणे इमारतीची रंगरंगोटी व इतर डागडुजीची कामे करण्यात आली. 2020 जानेवारीमध्ये शताब्दी उद्घाटन सोहळा उत्तम रीतीने पार पडला. माजी लोकसभा अध्यक्ष श्रीमती सुमित्राताई महाजन यांनी त्यावेळी आपल्या वास्तूस भेट दिली व अनेक वर्षापूर्वी आपल्या कुटुंबासहित येथे वास्तव्य केल्याच्या आठवणीही सांगितल्या.

आपल्या इमारतीचा काही भाग गेले काही वर्षे देना बँकेला भाड्याने देण्यात आला होता. त्यांनी ही जागा सोडल्यानंतर कोरोना काळातील मंदीमुळे अनेक प्रयत्न करूनही गेले वर्षभर ह्या जागेला भाडेकरू मिळू शकला नव्हता. प्रवासावरील निर्बंधांमुळे गेल्या वर्षभरात आपल्या डॉर्मेटरीचाही कमी उपयोग झाला. पण आता अजंठा फोटो स्टुडिओला देना बँकेची व डॉर्मेटरीची जागा 5 वर्षांच्या करारावर देण्यात आली आहे व इमारतीच्या वरच्या मजल्यावर डॉर्मेटरीची व्यवस्था केली आहे.

कोरोनाच्या निर्बंधांमुळे आपल्या वास्तुत मोठे सांस्कृतिक कार्यक्रम करणे शक्य होत नाही आहे. पण ह्या काळात आपण अनेकदा बाहेरून येणाऱ्या रिझर्व्ह पोलिसाची मोफत राहण्याची व्यवस्था आपल्या वास्तूत केली आहे. मंडळाचा लसीकरण कार्यक्रमही आपल्या वास्तूत घेतला गेला.

2020 सालचा अभिमान पुरस्कार आपला लाडका क्रिकेटपटू श्री.राहुल द्रविड यांना देण्याचे जाहीर केले होते, पण निर्बंधांमुळे हा कार्यक्रम अजून होऊ शकला नाही. आशा आहे की लवकरच निर्बंध कमी झाल्यानंतर हा कार्यक्रम उत्तमपणे पार पाडण्यात येईल.

या पूर्ण कालावधीत ट्रस्टची अनेक कामे पार पाडण्यात आपल्या ट्रस्टचे उपाध्यक्ष श्री. कवठेकर यांचा सिंहाचा वाटा आहे. आपले मॅनेजर श्री. हणमंते ह्यांनीही  इमारतीची जबाबदारीने काळजी घेतली आहे.

आशा करूया की हे कठीण दिवस लवकरच सरतील व आपण सर्व पुन्हा नव्या उत्साहाने, नव्या उमेदीने ह्या वास्तूत एकत्र जमून आनंदसोहळा साजरा करू!

**आपला नम्र**

**अजित एदलाबादकर**

**अध्यक्ष, महाराष्ट्र निवास विश्वस्त मंडळ**

# ओढ मातीची ....एक अनोखी मुलाखत

वाढते शहरीकरण आणि ओस पडत चाललेली गावं, तसा नेहमीच चर्चिला जाणार विषय. एकदा का माणूस शहरांत स्थिरावला की मागे वळून बघणे कठीण होते आणि हळूहळू तो शहरी होतो, मग उरतात त्या फक्त आठवणी. पण या स्वाभाविक परिस्थितीला छेद देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची आज मी ओळख करून देणार आहे.

ते आहेत श्री. संजय आणि उर्मिला जाधव.

आधीची काहीच ओळख नाही, उर्मिलाशी एक दोन वेळा फोनवर बोलणे झाले होते. मुलाखत घेण्याची माझी ही पहिलीच वेळ. एका मल्टिनॅशनल कंपनीच्या सीईओशी बोलायचे, ह्याचे मला खूप दडपण आले होते. दोघांच्या अगत्याने अनोळखी पणाच्या भिंती गळून पडल्या आणि आमच्या मनमोकळ्या गप्पा कधी सुरु झाल्या ते कळलेच नाही. संजय आणि उर्मिला त्यांच्या भूतकाळात रमलेच, मलाही बरोबर घेऊन गेले.

**मी:** सर माझी मुलाखत घ्यायची पहिलीच वेळ आहे.

**संजय:** अहो! माझी पण मराठीतून दिलेली पहिलीच मुलाखत आहे. त्यात माझं मराठी इतके चांगलं  नाही. मी पहिलीपासून होस्टेल मध्ये राहून पब्लिक स्कूल मध्ये शिकलो आहे.

**मी:** (मला बसलेला पहिला धक्का.) तुमचे गाव कोणते? संजयजी जरा मला तुमच्या कौटुंबिक पार्श्वभूमीबद्दल सांगा ना.

**संजय:** मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यातील चिलवडी हे माझे गाव. हे निजामशाहीत म्हणजे हैदराबाद संस्थानांत होते. त्यामुळे आमचा स्वातंत्र्य दिन 15 ऑगस्ट नाही. आजोबा स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व जाणले होते. माझे वडील आणि सर्व काका उच्च शिक्षित आहेत. आजोबांची बाहेर उठबस असल्याने त्यांना निजामाच्या हालचालींची माहिती असायची. वेळेवर सावध होऊन त्यांनी गाव खाली केले आणि संपूर्ण चिलवडी गाव निजामाने जाळले. मनुष्यहानी झाली नाही, पण अन्नधान्य जळून गेले. आजही जळलेली चिलवडी म्हणून बोलले जाते. आमचा आणि गावाचा मुख्य व्यवसाय शेती. एकत्र कुटुंब पद्धत. आम्ही एकावेळी आठ्ठेचाळीस माणसं होतो. अर्थात आता सगळे विभक्त होऊन आपापल्या क्षेत्रांत चांगले काम करीत आहेत. पण सगळ्यांची नाळ गावाशी जोडलेली आहे.

**मी:** असे असताना तुम्ही एकदम होस्टेलमध्ये, तेही पहिलीत म्हणजे जेमतेम पाच सहा वर्षाचे असताना?

**संजय:** आजोबा आणि वडिलांनी हा निर्णय घेतला होता आणि माझे तेरणा पब्लिक स्कूलमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण सुरू झाले.

**उर्मिला:** खरं तर संजय घरातील पहिला मुलगा. तरी त्यांना होस्टेलमध्ये ठेवले. तेही जवळपास 40/45 वर्षांपूर्वी.

**मी:** बापरे! आणि तुमची आई तयार झाली हे ही विशेषच.

**संजय:** अगदी खरं आहे, होस्टेलवर गेलो नसतो तर, एक वेगळाच संजय झालो असतो. होस्टेलवर राहिल्याने मी शिस्तप्रिय झालो. वेळेवर कामं करायची सवय लागली. माझ्या करिअर मध्ये त्याचा खूप फायदा झाला. पाचवीनंतर मी प्रवरा पब्लिक स्कूल मध्ये गेलो. ह्या शाळेत माझा सर्वांगीणविकास झाला. ही शाळा 'बेस्ट पब्लिक स्कूल इन रुरल एरिया' म्हणून गौरविली गेली होती. मी हॉकी खेळत होतो. बारावी पर्यंत मी ह्या शाळेत होतो. ह्या शाळेत असतानाच इंजिनिअरिंग करायचे हे मी पक्के ठरविले होते.

**मी:** इतक्या लहान वयात ही दृष्टी असणे दुर्मिळच.

**संजय:** मी वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी सोलापूर येथून इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर झालो. पुढे एम. बी. ए सुद्धा केले.

**मी:** तेव्हा कॅम्पस इंटरव्ह्यूची सुरुवात झाली होती का? किंवा तुमचा पहिला जॉब कोणता?

**संजय:** तसे बघायला गेलं तर माझा पहिला जॉब अहमदनगर येथे व्हिडिओकॉन मध्ये. पण एका महिन्यांतच मी कंटाळलो आणि औरंगाबादला बजाज मध्ये रुजू झालो. तिथे ही जेमतेम दोन तीन महिने होतो. खरं करियर सुरु झाले ते मुंबईत फिलिप्स मध्ये. आयुष्यात पहिल्यांदाच मुंबईला गेलो होतो. मुंबईतील वातावरण आणि कंपनीतील मल्टीनॅशनल कल्चर ह्याच्याशी जुळवून घेताना थोडा त्रास झाला. पण प्रत्येक काम वेळेवर, नेटाने आणि व्यवस्थितपणे केल्यामुळे प्रगती लवकर झाली. टेक्निकल पेक्षा सेल्स आणि मार्केटिंग हे माझे क्षेत्र आहे ह्याची जाणीव झाली. मग मात्र प्रगती होतच गेली. 26व्या वर्षी मी रिजनल हेड झालो.

संजय आपल्या भूतकाळात रमले होते. उर्मिला मध्येच काही बोलली आणि मी गाडी कौटुंबिक दिशेने वळवली.

**मी:** तुम्ही दोघे कसे आणि कुठे भेटलात? लव्ह की अरेंज ?

**उर्मिला:** ओळखीतून संजयचे स्थळ आले. सुचविणारी व्यक्ती मला खूप आवडायची, तिचा स्वभाव आवडायचा. ती सुचविते आहे म्हणजे संजय तसेच असतील असे वाटले आणि मी हो म्हटले. 1995 साली आम्ही लग्न केले.

**संजय:** खरं सांगायचं तर आज मी जो काही आहे ते उर्मिलामुळे. तिने संसाराची, मुलांची, माझ्या माणसांची जबाबदारी हसत हसत घेतली. त्यामुळे मी माझ्या कामांवर लक्ष केंद्रित करू शकलो. ती सुद्धा बी फार्म झालेली आहे.

**उर्मिला:** सासरचा मोठा गोतावळा पाहून, घरातील मोठी सून ह्या नात्याने सगळ्यांना बांधून ठेवणे ही माझी जबाबदारी आहे, हे माझ्या लक्षात आले. संजयना सख्या चुलत मिळून चौदा बहिणी आहेत. मोठी वहिनी म्हणून त्या माझ्याकडे पाहणार….म्हणून मी ही तडजोड स्वीकारली.

**संजय:** माझा जॉब फिरतीचा होता. ते सुध्दा देश विदेशात. कित्येक वेळा मी फक्त बॅग घ्यायला घरी यायचो.

**मी:** मग एकमेकांना वेळ कसा द्यायचात? हल्लीच्या मुलांची सतत तक्रार असते.

**उर्मिला:** आम्ही त्यावर मार्ग काढला होता. मी त्यांना एअरपोर्ट पर्यंत सोडायला आणि आणायला जायचे. वाटेत भरपूर गप्पा व्हायच्या.

**मी:** बेंगळुरूला कधी आलात?

**संजय:** 2001 मध्ये बेंगळुरूला जनरल इलेक्ट्रिक मध्ये बिझनेस हेड म्हणून जॉईन झालो. तिथे 11 वर्ष काम केले. सध्या CEO - Powergen Division, Sterling & Wilson Ltd.
Chairman - SPBES, A JV between S&W & PBES Canada.
Chairman - SW-Enel, A JV between S&W & Enel Italy. ह्या जबाबदाऱ्या आहेत.


**मी:** पुन्हा गावाकडे कसे वळलात?

**संजय:** प्रामाणिकपणे सांगायचे तर, उर्मिलामुळे मी कायम गावाशी जोडलेला राहिलो. तिचा हट्टच असायचा की सणाला गावी जायचेच. नेहमीच्या जाण्यायेण्याने गावाशी नाळ जोडलेलीच राहिली. 2006 सालापासून गावासाठी काहीतरी करु या म्हणून मागे लागली होती. आपण तर पुढे गेलो आता गावाला कसे पुढे नेता येईल ह्याचा विचार सुरु झाला आणि The Healing Touch Foundation चा जन्म झाला. इच्छा चांगली असली की मदत मिळतेच. मित्रांनी आणि आमच्या कंपनीने आर्थिक मदत दिली. समीर इनामदार आणि प्राजक्ता इनामदार यांचे मार्गदर्शन

आणि आर्थिक सहाय्य मिळाले. भाऊ गावीच राहत असल्याने त्याला सगळ्या गोष्टींची पूर्ण कल्पना होती. आम्ही गावांतील शाळेपासून सुरुवात केली. आज शाळेत अद्ययावत सुविधा उपलब्ध आहेत. वर्ग, कॉम्प्युटर लॅब, स्वच्छता गृह, क्रीडांगण, संरक्षक भिंत, पिण्याचे पाणी अश्या सगळ्या सोयी आहेत. संपूर्ण गावांतील रस्त्यावर LED दिवे लावले आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी दोन RO प्लांट बसविले आहेत. पाण्याची उपलब्धता असली की गावाचा विकास लवकर होतो, हे लक्षात आल्याने नदी पात्र रुंदीकरण आणि सखोलीकरण केले. आज उन्हाळ्यात सुद्धा आमचे गाव टँकरमुक्त आहे. आपण ह्या प्रोजेक्टचे पीपीटी बघू या का?

संजय आणि उर्मिलाच्या डोळ्यांत समाधान आणि गावाबद्दलची आत्मीयता दिसत होती.

**मी:** इच्छा तिथे मार्ग असे म्हणतात ते काही खोटं नाही.  मॉडर्न टेक्नॉलॉजी आणि गावाचा विकास ह्याचा अनोखा संगम आहे हा.




**मी:** आजच्या युवा पिढीला काय सांगाल?

**संजय:** मेहनत करा, ख्र्याने वागा, चुकीचे काही करु नका, आयुष्यात खूप पुढे जा पण समाजासाठी, गावासाठी काही तरी करत रहा. चांगले वाचन करत रहा. मी खूप मोठमोठ्या उद्योगपतींची आत्मचरित्र वाचली आहेत. त्याचा मला करिअरमध्ये खूप उपयोग झाला.

**मी:** आयुष्य म्हणजे चढ उतार आलेच, तुमचा काय अनुभव?

**संजय:** मी राजा शिवछत्रपती हे पुस्तक वाचले आहे, मराठी तितके येत नसल्याने वेळ लागला, पण नेटाने वाचले. त्यामुळे तह म्हणजे एखादे पाऊल मागे घ्यावे लागले तरी पुढील यशासाठी ते

आवश्यक असते हे लक्षात आले. तसेच वागत गेलो. मुद्दाम सांगतो की माझ्या इंग्रजी माध्यमातून शिकण्याचा मला करिअरमध्ये खूप फायदा झाला.

**मी:** आपण इतकावेळ मराठीतून बोलत आहोत, मला कुठेही जाणवले नाही की तुम्हाला मराठी येत नाही.

**संजय:** ह्याचे श्रेय पण उर्मिलालाच जाते. होस्टेल मध्ये रहात असल्याने मी काहीसा अबोल आणि माणसात न मिसळणारा होतो. हिने समजावून समजावून आता मी एकदम सोशल झालो आहे.

**उर्मिला:** संजय पटकन आपली चूक मान्य करतात आणि लगेच स्वतः मध्ये बदलही करतात. त्यांच्या यशात ह्या गुणांचा फार मोठा वाटा आहे. सहसा पटकन कोणी सॉरी म्हणत नाही ना ?

विनम्रतेचे मूर्तिमंत उदाहरण माझ्यासमोर उभे होते.

**मी:** आता पुढील योजना काय आहेत?

**संजय:** कोविडमुळे कामं थोडी लांबली आहेत. प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर आयुष्यात पहिल्यांदाच मी इतके दिवस सलग घरी राहिलो आहे.

**उर्मिला:** कोविड काळात मी एक छोटी कंपनी सुरू केली आहे, "द लोकल ऍग्रो", त्यासाठी मला त्यांच्या ज्ञानाचा फायदा झाला. एका कंपनीचा सीईओ असून सुद्धा, त्यांनी घरपोच सामान पोहचविले आहे.

पाणी फाउंडेशनचे काम करताना स्वतः घमेली उचलणारी उर्मिला आणि कठीण काळात घरोघरी सामान पोहचविणारा संजय .....मेड फॉर इच अदर. मी दोघांनाही मनोमन नमस्कार केला. ह्या व्यतिरिक्त वृक्षारोपण, प्लॅस्टिक मुक्त गाव, कापडी पिशव्यांचे वाटप, असे पर्यावरण पूरक उपक्रम ही ह्या जोडीचे सुरूच असतात.

हे सगळे ऐकून मी अचंबित झाले होते. शिवानी आणि ईशान ही त्यांची मुले त्यांच्याच तालमीत तयार होत आहेत. आमच्या गप्पा संपतच नव्हत्या. वेळेचे बंधन होते, मी निघताना संजय म्हणाले, " निवृत्तीनंतर गावी जाणार!"

ऊसाचा रस, ऑरगॅनिक गूळ आणि सुंदरशी पितळेची बैलगाडी मला भेट म्हणून दिली. मी आश्चर्याने बघतच राहिले.

"कितीही झाले तरी आम्ही मूळचे शेतकरीच आहोत ना?"

उंच भरारी घेतली तरी आपल्या मातीशी असलेले नातं जपण्यासाठी धडपडणाऱ्या जोडीला सलाम!

संजय उर्मिला यांची जोडी युवा पिढीला आदर्श ठरेल ह्यांत शंका नाही.

**शब्दांकन**

**स्मिता बर्वे.**

Click here for more on Healing Touch Foundation





# सनविवि पत्रलेखन स्पर्धेचे निकाल आणि परीक्षकाचे मनोगत

**--श्री.व्यंकटेश देवनपल्ली**

नमस्कार,

"भाव दाटले मनी अनंत, शब्द रूप देऊ त्याला

गणेशोत्सव निमित्ते आवाहन करितो लेखणीला !"

महाराष्ट्र मंडळातर्फे आयोजिलेल्या पत्रास कारण की.... ह्यात फक्त दहा पत्रलेखकांनी भाग घेतला आहे तर विनोदी कथा स्पर्धा ह्यात फक्त पाच लेखकांनी भाग घेतला आहे. महाराष्ट्र मंडळाची सभासद संख्या पाहता ह्या स्पर्धेस अत्यंत अल्प प्रतिसाद मिळाला आहे असे म्हणावे लागेल.

परीक्षण करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. लेखनात शुद्धलेखनाच्या ब्याच चुका आढळून आल्या. उदाहरणार्थ, तु, ठीकाणी, तीतक्याच, पहीला, मीळावा, पून्हा, नीघून आणांदाचा, आत्मवीश्वास ...... असे बरेच शब्द खटकत होते. असो.

पत्रलेखनात वर्षा सबनीस ह्यांनी लिहिलेले, तीर्थरूप आईस.. (सासूबाईंना लिहिलेले पत्र) हे पत्र चांगले आहे. मानसी तांबेकर ह्यांनी लिहिलेले, प्रिय नीरज.. हे पत्र नुकत्याच झालेल्या टोकियो ऑलिम्पिक २०२० स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्यास भाल्याने लिहिलेले पत्र नाविन्यपूर्ण आहे. कोरोनाने ग्रस्त झालेल्या जनमानसाकडून गणपती बाप्पास ऋचिता दवंडे ह्यांनी मनोभावे पत्र लिहिलेले आहे.

पत्रलेखन स्पर्धेचे निकाल:

क्रमांक पहिला - वर्षा सबनीस

क्रमांक दुसरा - मानसी तांबेकर

क्रमांक तिसरा - ऋचिता दवंडे

## सनविवि विशेषांक पत्रलेखन स्पर्धा २०२१ प्रथम पारितोषिक- वर्ष सबनीस

### तीर्थरूप आईस

सा. न . वि. वि .
हे पत्र लिहिताना मला खूप आनंद होतो आहे कारण तुम्हाला एक खूप आनंदाची बातमी सांगायची आहे . तुमच्या नातवाचं लग्न ठरले आहे . तुमचा नातू , आपला सुमेध ... त्याचं लग्न ठरलं पण आम्ही इकडे अमेरिकेत ...त्याच्या लग्न ठरवण्याच्या समारंभात तुम्ही नाही माझ्याबरोबर , ह्याच मला खूप वाईट वाटलं . आपल्याकडे कुठलाही प्रसंग असला तरी आपण सगळे जण बरोबर असतो , सगळे निर्णय एकमेकांशी चर्चा करून मगच घेतो . त्यामुळे तुमची अनुपस्थिती खूप जाणवली .

आनंदाची गोष्ट ही की त्याला त्याच्या आवडीची , त्याच्या मनासारखी मुलगी त्यांची लाईफ पार्टनर म्हणून मिळाली आहे . मुलगी खरच खूप सालस, शिकलेली आहे पण खरं सांगू का मला मात्र खूप दडपण आले आहे . इतके दिवस आई , सून ,बायको , मुलगी या सगळ्या भूमिका केल्या पण आता एक नवीन भूमिका करायची आहे... सासूची . ह्याच मला इतकं दडपण आलं की मला काही सुचेना . आणि मग माझ्या मनात तुमचा विचार आला . तुम्ही गेली 35 वर्ष सासूच्या भूमिकेत इतक्या सहजतेने वावरत आहात की तुमचा आदर्श समोर ठेवूनच माझ्या होणाऱ्या सुनेशी मी वागावं असं ठरवल आहे .

आई , माझ्या वयाची 24 वर्षं मी माझ्या आईबरोबर काढली . त्यात कळती वर्ष बघितली तर फार तर 15 असतील . पण तुमच्या बरोबर मात्र मी गेली 35 वर्ष राहते आहे . कळत नकळत तुमचेच संस्कार झाले माझ्यावर ... अनेक गोष्टी तुमच्याकडून शिकले , आपण मिळुन सणवार साजरे केले ... लग्न होऊन , माप ओलांडून आल्यापासून तुम्ही मला प्रत्येक वेळी , मी ह्या घराची अविभाज्य घटक असल्याचे जाणवून दिले .माझ्या प्रत्येक इच्छेला मान दिलात . मला, माझ्या चुकांना सावरून घेतलं ...मी पण माझ्या सुनेला , तिच्या प्रत्येक मताला , तिच्या इच्छेला असेच प्राधान्य देईन .

घरात येणारी सून , तिची सगळी नाती मागे ठेऊन नवी नाती फुलवायला , नवीन घरात, नवीन वातावरणात येते . तिचे मन , तिच्या इच्छा आपण जपायला हव्या, हे मी तुमच्याकडून शिकले . आपले रीतिरिवाज , आपली माणस, कशी जपायची हे शिकले . हा परंपरेचा वसा पुढच्या पिढीपर्यंत पोचवायचे बळ तुमच्या कडून मिळाले आहे , आता ह्यात सफलता मिळो असा आशीर्वाद हवा आहे ...

एकत्र कुटुंबात , आनंदात राहणं ही सोपी गोष्ट नाही पण तुम्ही ते सहज शक्य करून दाखवलं . एकमेकांशी जुळवून घेत ,आपण आजपर्यंत गुण्यागोविंदाने राहिलो ...ह्या दरम्यान आपल्यात अनेक मतभेद झाले , पण दुसऱ्या दिवशी सकाळी आपण सगळं विसरुन सकाळच्या चहाचा आनंद घेत होतो ... आणि म्हणूनच आपण इतकी वर्षे एकत्र राहू शकलो . ह्यात तुमचा सिंहाचा वाटा आहे .

आता तर एक पूर्ण पिढी मागे पडली आहे. नवीन मताची ही नवीन पिढी खर तर खूप practically विचार करणारी आहे , त्याच्या कडून शिकण्यासारखे खूप आहे ... जमेल का मला त्यांच्यात मिसळायला ?

आता नातसुनेच्या स्वागताच्या तयारीला तुम्ही काय करणार ह्याची उत्सुकता आहे ...अर्थात हेही आपण सगळे मिळूनच करणार आहोत ... मी सूनमुख..नाही नातसून मुख थाटात करायचं ठरवलं आहे ...तो मान तुमचाच ...

खरं तर ह्या ऑनलाइन च्या, व्हाट्सअप्प च्या जमान्यात कुणी पत्र लिहीत नाही पण माझे मनोगत तुमच्या पर्यंत पोहोचावे अशी इच्छा होती आणि मन मोकळं करायला पत्रासारखे दुसरे साधन नाही असे मला वाटते म्हणून हा पत्र प्रपंच ...

आता लवकरच भेटू ... हे कोरोनाचे सावट कधी दूर होतंय ह्याची वाट बघतो आहोत . लग्न भारतात, किंबहुना बंगलोरलाच होणार आहे . त्या पूर्वी नातसुनेची भेट मोबाईलवर होईलच
आता तुमच्या तब्येतीची काळजी घेऊन छान फिट राहा म्हणजे लग्न एन्जॉय करता येईल . मला खात्री आहे की हे पत्र मिळाल्या बरोबर तुमचे विचारचक्र सुरु होणार , प्लांनिंग सुरु होणार ...
माझ्या होणाऱ्या सुनेशी , माझे नाते आपल्यासारखे असावे असे वाटते . तसा आशीर्वाद मला तुमच्या कडून हवा आहे .

**तुमची**
**वर्षा**



## सनविवि विशेषांक पत्रलेखन स्पर्धा २०२१ द्वितीय पारितोषिक - मानसी तांबेकर

**प्रिय नीरज,**

पत्रास कारण की आज तुझ्या सोबत टोकियो ऑलिंपिक मध्ये 'भालाफेक' या स्पर्धेत इतिहास रचतांना घेतलेली उंच भरारी आठवली. तुझ्या इतकतच मलाही दडपण आलं होतं. कुठेतरी वाटत होतं की माझं टोकदार रूप आणि त्या मुळे इतिहासात असलेलं माझं स्वरूप खऱ्या अर्थाने बदलेल. शस्त्र असून ही पुन्हा एकदा एक वेगळी ओळख मिळेल अशी आशा वाटत होती. तुझ्या हातातून दिमाखदारपणे सुटलेला मी वाऱ्याच्या वेग भेदत ,सूई -सूई आवाज़ करत जेव्हा जमिनीत आरपार घुसलो तेव्हा धरती ही हादरली. पण जाणवलं ;स्वप्नपूर्ती झाली. तो एक क्षण ...जेव्हा सुवर्णपदकासाठी तुझ्या नावाची घोषणा झाली तेव्हा ऊर अभिमानाने भरून आला. तब्बल 13 वर्षांनी सुवर्णपदकाच्या यादीत भारताचे नाव झळाळले ; ते तुझ्या प्रशंसनीय कामगिरीमुळे. तुझ्या माध्यमातून मातृभूमीसाठी काहीतरी चांगलं केल्याने जीवन सार्थकी लागल्याची भावना जागृत झाली. महाभारतातील ज्येष्ठ पांडव युधिष्ठीर ही' भालाफेक मध्ये पारंगत होता.त्याने त्याचं कौशल्य युद्धभूमीवर दाखवलं आणि तू ऑलम्पिक चा रणभूमीवर.खरतरं भाला हे एक लांबदांडीचं, भूसेनेतील पायदळ व घोडदळ सैनिकांचं पारंपरिक शस्त्र. रामायण, महाभारतच नाही तर अगदी छत्रपति शिवाजी महाराजांच्या काळात सुद्धा माझा वापर होत होता.युद्धात शत्रूवर चाल करून त्याला भोसकण्यासाठी, काहीवेळा शत्रुवर दूर अंतरावरुन फेकून मारा करण्यासाठी तर कधी शिकारीसाठी. माझ्या टोकाने घायाळ झालेली, विव्हळणारी रक्तबंबाळ शरीरे जेव्हा पाहिली तेव्हा तेच टोक माझ्या जिव्हारी लागलं. माणूस या शस्त्रांनी हिंसा का करतो ह्याचं उत्तर मी शोधू लागलो. दुसऱ्यावर आपलं वर्चस्व गाजवण्याची वृत्ती उफाळून आली आणि मग त्यातून बचावाची भूमिका घ्यावी लागली की माणूस शस्त्र हाती घेतो. या शस्त्रांमुळे केवळ शारीरिक हानी च नाही तर कधीतरी शाब्दिक शस्त्रांनी एकमेकांवर प्रहार करून, कुणाला कमी लेखून ,उणे-दुणे काढून मानसिक खच्चीकरण ही होते.आज अस्त्र-शस्त्रांच्या विळख्यात माणूस पुरता अडकला आहे. सत्तेच्या हव्यासापोटी माणूस जग जिंकायला निघाला आहे. त्यासाठी कधी आण्विक, कधी जैविक अस्त्र -शस्त्रांची निर्मिती करून त्या द्वारे आपले बळ दाखवून देत आहे. पण नीरज , आज तू भाला हातात घेऊन दाखवून दिलेस की 'शस्त्र मग ते कुठचेही असो एक साधन आहे साध्य नाही. या हातात आलेल्या साधनाची जर आपण योग्य साधना केली तर जग जिंकू शकतो हे तू पटवून दिलेस एका वेगळ्या अर्थाने. पानिपतच्या युद्धात तुझ्या वंशजांनी हेच शस्त्र वापरल. तुझ्या रक्तात याच मराठयांची ताकत असल्याने तू ही कामगिरी फत्ते केली म्हणे फरक हा की तू मला

हाती घेतलंस एका सकारात्मक दृष्टिकोनातून. हातात शस्त्र आलं पण त्याचे वार उन्नतीच्या दिशेने करायला शिकले पाहिजे हेच तू आज तुझ्या कृतीतून दाखवून दिलेस आणि नकळतपणे मानवजातीला एक धडा दिलास की  मनुष्यासाठी शस्त्र आहे ,शस्त्रासाठी मनुष्य नव्हे. या गोष्टीचे कौतुक करावे तेवढे थोडेच. ज्या शस्त्राच्या मूळ शिल्पात कालपरत्वे मुळीच बदल झाला नाही असं ‘भाला’  हे एकमेव शस्त्र आहे. ‘भालाफेक’  हा खेळ ऑलिम्पिक मध्ये खेळला जात असला तरी ‘भाला म्हणजे युद्ध’  ह्या समीकरणाला तडा गेला. नीरज, तू हात दिलास आणि जनमनात नवीन ओळख निर्माण झाली त्याबद्दल तुझे मनापासून आभार. शेवटी एवढेच म्हणेन-

होऊ देत पूर्ण तुझी सारी स्वप्न,

मी ही तुझ्या यशासाठी नेहमीच करेन प्रयत्न .

**तुझा कृतज्ञ,**

**भाला**

मानसी गजानन तांबेकर

Mobile No. 9980700711



## सनविवि विशेषांक पत्रलेखन स्पर्ध २०२१ तृतीय पारितोषिक - ऋचिता दवंडे.

|| श्री ||

**प्रिय देवास,**

शि.सा.न.

पत्र लिहिण्यास कारण की महिन्याभरात तुझे गणपती रूपात आगमन होते आहे तेंव्हा येताना कोरोना परिस्थीतीवर काहीतरी उपाय घेऊन ये. फारच कंटाळलो आहे आम्ही कोरोनाला. गेल्या वर्षा-दीडवर्षापासून कोरोनाच्या भितीमुळे घरात बसून आहोत. कुठे जाणे नाही की येणे नाही. घर एके घर अशी स्थिती आहे.

मागच्या मार्चपासून सुरु झालेल्या ह्या कोरोनाच्या महासागराची भरती ओहोटी सुरुच आहे. पहिली लाट त्यानंतर लॉकडाऊन, पून्हा दुसरी लाट पून्हा लॉकडाऊन ह्या सगळ्याने अक्षरशः पिंजून गेलो आहोत. लॉकडाऊनच्या काळात तर अख्ख जग घरात कैद होते. आबालवृद्धांपासून सगळ्यांनाच ह्या कोरोनाच्या तडाखा बसला आहे. लहान मुलांना मोकळेपणे बाहेर खेळता येत नाही. मुलांचे बालपणच जणु हिरावले आहे. त्यांच्यातील निरागसता हरवते आहे.शाळा,परीक्षा सगळेच ऑनलाईन. नुसते घरात बसणे, ऑनलाईन क्लासेस ह्या सगळ्याचा विपरीत परिणाम त्यांच्या वाढीवर होतो आहे. तसेच सतत क्लाससाठी लॅपटॉप,कॉमप्युटर समोर बसल्याने मुलांना कमी वयात चष्मे लागण्याचे प्रमाण वाढत आहे. वृद्ध, तरुण आणि लहान मुलं सगळीच कंटाळून गेली आहेत.सगळ्यांचे एक प्रकारे मानसिक खच्चीकरण होते आहे. कित्येक तरुण लोकांच्या नोकऱ्या गेल्या. संसार कसा चालवायचा ह्या एकाच प्रश्नाने ही लोक खचून गेली आहेत. असंख्य संसार उघड्यावर आले. व्यापारी, छोटे दुकानदार, हातगाडीवाले सगळ्यांचीच फजिती झाली कोरोनामुळे.लॉकडाऊनमध्ये तर बऱ्याच लोकांची खायची भ्रांत होती. गरीब श्रीमंत असा कुठलाच भेद न ठेवता सगळ्यांवरच हल्ला केला ह्या कोरोनाने.

कोरोना झालेल्या लोकांचे आणि त्यांच्या कुटुंबाचे हाल तर बघायलाच नको. कोरोना झालेली व्यक्ती हॉस्पिटलमध्ये, इतर कुटुंब सदस्य क्वारेनटाईन म्हणून घरी असे चित्र होते. हॉस्पिटलमध्ये असणारा आपला माणुस ठीक होऊन घरी येईल की नाही ह्याची शाश्वती नाही.त्याला बघायला जायची मुभा नाही.असे कित्येक लोकं आहेत की ज्यांना आपल्या माणसांना शेवटचे पाहता देखील आले नाही की त्यांचे अंतिम कार्यही करता आले नाही. ह्या पेक्षा दयनीय दुसरे काय असु शकते देवा ! किती लोक गेले ह्याची तर गणतीच नाही. कोरोनाच्या ह्या पहिल्या दुसऱ्या लाटेने कोणाच्या वृद्ध आई वडिलांना,कोणाच्या तरुण मुलाला तर कोणाच्या जिवलग मित्राला आपल्यासोबत ओढले आहे.

ऍम्ब्युलन्सची कमतरता, इंजेकशन्स, ऑक्सिजन सिलेंडर्सची कमी, डॉक्टर्स,नर्सेसची अपुरी संख्या ह्या सगळ्यामुळे परिस्थिती अजुनच बिकट झाली.अशातच इंजेकशन्स, ऑक्सिजन सिलेंडर्स एवढेच कशाला अगदी हॉस्पिटल बेड्ससाठीही काळाबाजार झाला. आपल्या माणसाचा

जीव वाचावा म्हणून लोकांनी कर्ज काढून हे सगळे मिळवले. आपले घरदार, दागदागिने पणाला लावले.

लग्न,मुंज यांसारखे मंगलकार्य जे आप्तपरिवार,मित्र मैत्रिणी ह्यांच्या उपस्थितीत पार पडतात ते केवळ २०-२५ जवळील लोकांच्या उपस्थितीत करावे लागले. मेहनतीने आणि उत्साहाने केलेल्या सगळ्या तयारीवर पाणी फिरले.बऱ्याच लोकांचे ह्यात मोठे नुकसान झाले.

घराबाहेर पडण्यास आलेल्या मर्यादेमुळे सगळेच ऑनलाईन झाले.भाजी, किराणा, शॉपिंग एवढेच नाही तर शाळा, ऑफिसचे काम, वाढदिवस सेलिब्रेशन आणि अगदी डोहाळेजेवण देखील ऑनलाईन. ह्या ऑनलाईन पद्धतीने घरात बसून एकमेकांशी बोलता आले, बघता आले पण जो आनंद प्रत्यक्ष भेटून, सहवासाने मिळतो तो आनंद ह्या ऑनलाईन भेटीत नाही. नौकरी करणाऱ्यांसाठी वर्क फ्रॉम होम ह्या संकल्पनेमुळे कामाच्या वेळा तर वाढल्याच आणि सोबत आरोग्याच्या तक्रारीही.कारण ह्यात सारखे एकाच जागी बसून काम करायचे असते.

आता वॅक्सीन्स आले आहेत पण मागणी जास्त आणि उत्पादन कमी अश्या स्तिथीमुळे अजूनही बऱ्याच लोकांना वॅक्सीन्स मिळाले नाहीत.तेंव्हा देवा व्हॅक्सीन्सचे उत्पादन वाढून ते तळागाळातील लोकांपर्यंत पोहचू दे!

अगदी खरं सांग हा देवा तुला तरी करमत होते का रे तुझ्या भक्तांशिवाय? तुझीही सर्वच मंदिरे बंद होती. तुझे वारकरी तुझ्या दर्शनाला येऊ शकले नाहीत की तुझा गणेशोत्सव नीट साजरा झाला नाही. नवरात्राचीही तीच कहाणी.तरीही घरात बसून शक्य तसे तुझे सगळे सण उत्सव केलेत हा आम्ही!

आता तर पून्हा तिसरी लाट येणार असं म्हणतात आहे पण देवा आता पुरे झाले रे! लवकरात लवकर ह्या कोरोनाच्या विळख्यातून मुक्त कर आम्हाला. मोकळा श्वास घेऊन बाहेर पडता येईल असं काहीतरी कर.तुझे सगळ्याच रुपातील सणवार उत्सव धड्याक्यात आणि उत्साहाने साजरे करायचे आहेत आम्हाला.आमच्या मुलांना बेधकपणे शाळेत पाठवायचे आहे. त्यांना परत पूर्वीसारखे खेळु, बागडू द्यायचे आहे. तुलाही आवडेलच ना आमची मुलंबाळं स्वछंदीपणे बागडताना पाहायला? अजून एक देवा,अठरा वर्षांखालील मुलांसाठीही लवकर वॅक्सीन येऊ दे. जेणेकरून मुलेही सुरक्षित होतील.तसेच सर्वांना मास्क घालण्याची,सोशल डिस्टंसिंग पाळायची बुद्धी दे आणि हो थोडीशी बुद्धी ह्या मीडियावाल्याना पण दे.सारख्या सारख्या कोरोनाच्या बातम्यांचा भडीमार करून हादरवून सोडतात. आधीच घाबरलेला माणूस अजून घाबरतो अशा बातम्यांनी. एक मात्र खरं देवा की कोरोनाच्या बिकट परिस्थितीत डॉक्टर्स, नर्सेस,स्वयंसेवक अशा कोणत्या ना कोणत्या रुपात तू आम्हाला साथ दिलीस.आमच्या पाठीशी उभा राहिलास.पण तुला हात जोडून विनंती आहे की आता गणपती रुपात येताना कोरोनाच्या महासागराला कायमस्वरुपी शांत करण्यासाठी जालीम उपाय घेऊन ये आणि सोडव अख्ख्या जगाला ह्यातून.

तुझीच,
एक कोरोनाने त्रस्त झालेली भक्त
सौ. ऋचिता बोधनकर दवंडे

## सनविवि कथालेखन स्पर्धेचे निकाल आणि परीक्षकाचे मनोगत

**--श्री.व्यंकटेश देवनपल्ली**

विनोदी कथा स्पर्धा:

बालचंद्र उखळकर ह्यांनी लिहिलेली 'बनेची बनवेगिरी' ही विनोदी कथा चांगली जमलेली आहे. कथेचा शेवटही अनपेक्षित आणि चांगला आहे.

अविनाश चिंचवडकर ह्यांनी लिहिलेली 'माझी दीक्षितगिरी' ही विनोदी कथा म्हणता येणार नाही. परंतु हे हलकेफुलके निवेदन निश्चितच विनोदी कथेच्या अंगाने जाणारे आहे.

तिसऱ्या बक्षीसास पात्र एकही कथा नाही असे खेदाने म्हणावेसे वाटते. असो.

विनोदी कथा स्पर्धा
क्रमांक पहिला - बालचंद्र उखळकर
क्रमांक दुसरा - अविनाश चिंचवडकर

आपण मला परीक्षक म्हणून नेमलंत, हा मी माझा सन्मान समजतो.

धन्यवाद
व्यंकटेश देवनपल्ली, बेंगलूरु



## सनविवि विशेषांक विनोदी कथालेखन स्पर्धा २०२१ प्रथम पारितोषिक - बालचंद्र उखळकर

# बनेची बनवेगिरी

'पोरं धमाल पोरी कमाल' ह्या तुफान विनोदी फार्सिकल नाटकाचा, प्रेक्षकांना सतत हसवणारा दोन तासांचा प्रयोग संपला होता. नाटकाची नायिका आणि टिव्ही सिरीयल्समधून प्रेक्षकांना दिसणारी सुंदर, सेक्सी रसिका राजे उत्साही प्रक्षकांच्या गराड्यात त्यांच्याशी बोलत होती, फोटो काढून घेत होती. त्यावेळेस दोन व्यक्ती मात्रं त्यांच्यापासून लांब उभ्या होत्या. काही वेळाने संस्थेचे व्यवस्थापक काशीकर ह्यांनी गोडीगुलाबीने लोकांना परतवलं आणि रसिका मेकअप रूमकडे वळली. त्याचवेळेस त्या दोन व्यक्ती रसिकाला सामोऱ्या गेल्या. त्यात एक पंचवीशीतला तरूण होता आणि त्याच्याबरोबर असलेले दुसरे गृहस्थ मात्रं पंचाहत्तरीतले म्हातारे होते. त्यांच्या एका हातात काठी होती आणि दुसरा हात त्या तरूणाने धरला होता. ह्या दोन्ही आधारांनी ते गृहस्थ कसेबसे हळूहळू चालत होते. झब्बा पायजामा, गळ्याभोवती मफलर, एपीजे अब्दुल कलामांसारखे वाढलेले, पण पूर्ण पांढरे झालेले केस, तशाच दाट पांढ्या भुवया व मिशा, जाड भिंगांचा चष्मा, थोडे पुढे आलेले वरचे दोनतीन दात असं त्यांचं रुप होतं. ते दोघंही रसिकाजवळ येऊन पोचले, तसा तो तरूण घाईघाईने म्हणाला,

"रसिका मॅम, - हे - हे माझे आजोबा. बनेश्वर बल्लाळ. इथले ज्येष्ठ नाट्य कलाकार आहेत. इथल्या नाट्यक्षेत्रातले सगळे लोक ह्यांना बन्याबापू म्हणून ओळखतात."

रसिकानं त्या म्हाताऱ्या गृहस्थांना हात जोडून नमस्कार केला आणि म्हणाली,

" मग तुम्हाला माझं नाटक आवडलं का आजोबा ?"

"अगं तुझं नाटक तर आवडलंच पण तू सुद्धा - "

थरथरत्या आवाजात ते आजोबा बोलायला लागले, पण

त्या क्षणाला आजोबांना तोडत घाईने तो तरूण म्हणाला,

"म्हणजे तुमचा अभिनय आवडला असं त्यांना म्हणायचं आहे. वयामुळे बोलतांना त्यांची जरा -"

त्यावर थोडं स्मित करत रसिका म्हणाली,

"हे तर माझं भाग्यच. नाहीतर तुमच्या पिढीतले लोक आमच्या नाटकांना नावं ठेवतात. नाकं मुरडतात."

"छे छे मला तुझं नाटक आणि तुझं कामही खूप आवडलं. काय सुंदर अभिनय करतेस तू पोरी ऽ.."

बोलता बोलता म्हातारबाबा रसिकाच्या अगदी जवळ सरकले आणि तिच्या केसांवरून हात फिरवत म्हणाले,

"आमच्या काळात तुझ्यासारख्या पोरी मिळाल्या असत्या -"

"म्हणजे नाटकात काम करायला -"

त्या तरुणानं पुन्हा घाईघाईत पुस्ती जोडली. त्यावर रसिकाच्या डोक्यावरचा हात तिच्या पाठीवर आणत म्हातारबाबा म्हणाले,

"तेच - तर आम्ही - आम्ही -"

बोलता बोलता म्हातारबाबा थांबले. अचानक त्यांनी आपल्या थरथरणाऱ्या हातांमध्ये रसिकाचा हात धरला आणि म्हणाले,

"पोरी, तुला ह्या म्हाताऱ्याची एक विनंती आहे."

"काय आजोबा ?" आपला हात त्यांच्या हातातून सोडवून घेत रसिका म्हणाली.

"तुझा उद्या रात्री पुन्हा इथेच प्रयोग आहे ना? मग दुपारी माझ्या घरी येशील ? मला खूप छान वाटेल."

रसिका जरा गडबडली. पण मग पटकन् म्हणाली,

"नाही आजोबा. मला असं काही करता येणार नाही."

त्याबरोबर पुन्हा एकदा तिचा हात धरत म्हातारबाबा म्हणाले,

"नाही नको म्हणूस बेटा. मीही तुझ्यासारखाच रंगभूमीचा सेवक आहे. आजपर्यंत मराठी रंगभूमीवरच्या पुष्कळ कलावंतांनी माझ्या घरी धूळ झाडली आहे. त्या आठवणी मी माझ्या ह्रदयाशी जतन करून ठेवल्या आहेत -.."

बोलता बोलता आजोबांचा गळा दाटून आला, शरीर थरथरायला लागलं, तरीही ते बोलतच राहिले.

"कुणी सांगावं, ह्यापुढे कुणा कलावंताला माझ्या घरी नेण्यासाठी मी ह्या जगात असेन की नाही..."

म्हातारबाबा बोलत होते आणि त्यांच्या हातातून हात सोडवून न घेता रसिका त्यांच्याकडे पहात होती. अचानक तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. आपला हात सोडवून घेत ती घाईने म्हणाली,

"बरं आजोबा, मी येईन उद्या तुमच्याकडे."

मग चटकन् काशीकरांकडे वळून ती म्हणाली,

"उद्या दुपारी चार वाजता ह्यांच्याकडे जाण्याची व्यवस्था करा" आणि चटकन् ग्रीनरूममध्ये निघून गेली.

त्यानंतर त्या काशीकरांशी बोलल्यानंतर असं ठरलं की दुसऱ्या दिवशी दुपारी चार वाजता त्या तरूणानं गाडी घेऊन नाटकाचे कलाकार थांबले होते त्या हॉटेलमध्ये जायचं, रसिकाला गाडीत घरी न्यायचं आणि पाच वाजेपर्यंत हॉटेलमध्ये परत आणून सोडायचं. मुख्य म्हणजे ही गोष्ट आणखी कुणालाही कळता कामा नये. त्यांच्या घरी किंवा घराच्या आसपास लोकांची गर्दी आहे असं दिसलं तर रसिका गाडीतून न उतरता परत येईल.

हे सगळं ठरवून तो तरूण आणि ते आजोबा परत निघाले.

थोड्याच वेळात ऑडीटोरीयमच्या गेटमधून एक टू व्हीलर बाहेर पडली. त्या टूव्हीलरवर मघाचा तो तरूण आणि म्हातारबाबा होते. गाडी रस्त्याला लागली, थोड्या दूर अंतरावर गेली आणि एकाएकी गाडीवर मागे बसलेले म्हातारबाबा जोरजोरात हसायला लागले, पण त्यांचं हसणं म्हाताऱ्यासारखं नव्हे तर एखाद्या तरूणासारखं वाटत होतं. त्याबरोबर गाडी चालवणारा तो तरूण म्हणाला,

"साल्या बन्या, हसतोस काय?"
"अरे हे विजयाचं हास्य आहे. मराठी नाटक आणि टिव्हीवरच्या एका सुंदर, सेक्सी नटीला हातोहात बनवल्याचा आणि तिच्याशी शारिरीक जवळीक साधल्याचा हा विजय मी हसून साजरा करतो आहे."
"मरो तो विजय! साल्या माझी केवढी फाटली होती - तू फारच चेकाळला होतास. तिच्या पाठीवरून हात फिरवलास, तिचा हात हातात घेऊन कुरवाळलास -आणि काय रे, हे तिला घरी बोलावण्याचं काय काढलं वेळेवर?"
"ते माझं आधीच ठरलं होतं. फक्त तुला सांगितलं नव्हतं. म्हटलं ट्राय मारून पाहू. जमलं तर जमलं."
"अरे पण आता उद्या काय करणार आहेस?"
भास्कर बने उर्फ बन्या हा स्वत: एक नाट्यकलाकार होता. विशेषत: म्हाताऱ्या माणसांच्या भूमिका करण्यामध्ये त्याचा हातखंडा होता. रसिका राजे ही मराठी सिरीयल्समधली  नटी त्याची विशेष आवडती होती. तिचं 'पोरं धमाल पोरी कमाल' हे नाटकही खूप गाजत होतं आणि त्या नाटकाचे दोन प्रयोग नागपूरात होत आहेत हे कळल्यावर तर बने खूपच उत्तेजित झाला होता. त्या नाटकाच्या शनिवारच्या प्रयोगाची दोन तिकीटं, तीही अगदी समोरच्या रांगेतली, त्यानं लगेच काढली होती. पण एवढ्यावर संतुष्ट होईल तो 'बन्या' कसला? त्याला रसिकाशी विशेष जवळीक साधायची होती. मग त्याच्या डोक्यात ही 'ज्येष्ठ, वयस्क नाट्यकर्मी' ची शक्कल आली होती आणि त्याचा जवळचा मित्र रघ्यानंही - आढेवढे घेत का होईना - पण त्याला साथ द्यायचं कबूल केलं होतं. आणि त्यांचा तो प्रयोग शंभर टक्के यशस्वी झाला होता. बनेच्या वेशभूषेने आणि अभिनयाने रसिका शंभर टक्के चकली होती आणि उद्या चक्क त्याच्या घरी येणार होती. पण रघूच्या डोक्यात वारंवार एकच प्रश्न घोळत होता. 'उद्या काय ? उद्या रसिका घरी आल्यावर बने काय करणार होता ? आणि आज रसिका फसली, पण उद्या दिवसाढवळ्या तिच्या लक्षात आलं तर ? किंवा कशामुळे तरी बनेचं बिंग फुटलं तर ?" हे सगळं राघू बोलल्यावर बने म्हणाला,
"उद्या मी स्वत:च  तिला सगळं उघड करून सांगणार आहे. म्हणजे - आधी मी तिला बन्याबापू म्हणूनच सामोरा जाणार आहे, पण नंतर लगेच मी तिला सगळं काही सांगणार आणि तिच्या समोरच माझा मेकअपही उतरवणार -"
"आणि त्यानंतर ती भडकली तर?"
राघूनं धसकून विचारलं. त्यावर आत्मविश्वासानं हसत बने म्हणाला,
"नाही भडकणार. मला खात्री आहे. उलट ती माझ्या अभिनय कौशल्यावर खुश होईल आणि शक्यता आहे, माझं नाव एखाद्या नाटकासाठी किंवा सिरीयलसाठी रेकमेंड सुद्धा करेल."
राघूला हे काही पटलं नाही, पण तो काही बोलला नाही. मात्रं उद्या काही भानगड झाली तर आपण सरळ पळ काढायचा एवढं त्यानं मनाशी पक्कं ठरवून टाकलं.

■ ■ ■

दुपारचे चार वाजले होते. बने बन्याबापूच्या गेटअपमध्ये आतुरतेने वाट पहात बसला होता. काल ठरल्याप्रमाणे राघू भाड्याची गाडी घेऊन रसिकाला आणायला गेला होता.

बने थोडासा अस्वस्थ होता खरा, पण त्याला खात्री होती की सगळं त्यानं ठरवल्याप्रमाणेच होणार. चार वाजून दहा मिनीटांनी दाराची बेल वाजली आणि घाईघाईत एकदा स्वत:ला आरशात निरखून बनेनं दार उघडलं.

दारात राघू उभा होता, पण त्याच्यासोबत रसिका नव्हती तर पन्नास - पंचावन्न वर्षांच्या एक काळ्यासावळ्या बाई होत्या.

"ह्या रसिका मॅँमच्या आई, राधाबाई. रसिका मॅँमकडे काही लोक आले आहेत. ते गेले की काशीकर त्यांना घेऊन येणार आहेत. काशीकरांनी आपल्या घराचा पत्ता आणि माझा नंबर घेतला आहे."

त्यावर बने काही बोलणार त्याआधी घरात शिरत आणि सोफ्यावर बसकण मारत त्या बाई किन्ऱ्या आवाजात म्हणाल्या,

"काल रसिका तुमची खूप तारीफ करत होती. म्हणून मलाही तुमची भेट घ्यायची इच्छा झाली."

ह्यावर बने कसंनुसं हसला, आणि त्यांच्या समोरच्या खुर्चीवर बसला. पण राघू मात्रं बाजूला उभाच राहिला. थोडीशी चेहरेपट्टी आणि अंगकाठी वगळता रंग, आवाज आणि बोलण्याची ढब ह्या कशातही ती बाई रसिकाची आई वाटत नव्हती. त्या बाईही बनेला निरखत राहिल्या. एकाएकी त्या म्हणाल्या,

"आमची रसिका खूप आवडली ना तुम्हाला?"

"अं - हो - म्हणजे तिचा अभिनय आवडला. म्हणून तर तिला घरी बोलावलं. म्हणजे काय आहे की-"

"पण तिचा अभिनय पहायला लोक नाटकाला जातात, नाहीतर तिची सिरीयल बघतात. तिला घरी बोलवत नाहीत."

बने थोडा गडबडला. त्यानं राघूकडे पाहिलं, तर राघू मुद्दाम इकडे तिकडे पहात राहिला. आता काय उत्तर द्यावं ह्याचा बने विचार करतच होता, तेवढ्यात त्या बाईंचा फोन वाजला. त्याबरोबर तो फोन कट करून बाईंनी अनपेक्षितपणे उठून पटकन्  दार उघडलं. हे सगळं क्षणात झालं. उघड्या दारात कालचे ते काशीकर आणि - आणि त्यांच्यासोबत एक पोलीस इन्स्पेक्टर आणि त्यांच्या मागे एक हवालदार असे तिघेजण उभे होते.

त्यानंतर सगळा सीनच बदलून गेला. ते तिघेही आत घुसले. पाठोपाठ त्या बाईंनी पुढे होऊन बनेच्या डोक्याला हात घातला आणि पांढ्या केसांचा त्याचा विग ओढून काढला. डोळ्यांरच्या नकली भुवया, नकली जाड मिशी हेही सगळं ओढून काढलं.  ते पाहून राघू पळायच्या बेतात होता, पण दारातल्या हवालदारानं त्याची वाट अडवलेली होती. आधीच दारात इन्स्पेक्टरला पाहून तंतरलेला बने त्याचं सोंग उघड झाल्याबरोबर  मटकन् बसला, आणि ती बाई कडाडली,

"इन्स्पेक्टर, घ्या ह्या दोघांनाही तुमच्या ताब्यात. म्हातारा बनून माझ्या पोरीला घरी बोलावतो काय?"

त्यानंतर त्या खोलीत बरंच नाट्य घडलं. बने आणि राघू त्या इन्स्पेक्टरच्या फक्त पाया पडायचे बाकी राहिले. बनेनं रडत भेकत हे सगळं करण्यामागे आपला खरा उद्देश काय होता हे त्या इन्स्पेक्टरला समजावण्याचा प्रयत्न केला. त्यानं तीनतीनदा त्या बाईची माफी मागितली. राघू तर

चक्क तिच्या पाया पडला. खूप भवती न भवती झाली. शेवटी अर्ध्या तासानंतर कशीबशी ती बाई पटली, इन्स्पेक्टरही थंडावला आणि पुन्हा असा वात्रटपणा कुणाही बरोबर कधीही करणार नाही हे त्या दोघांनीही कान धरून उठाबशा काढत कबूल केल्यावर ते सगळे घराच्या बाहेर पडले.

ते सगळे गेल्यावर ते दोघंही एकमेकांच्या नजरा चुकवत बसून राहिले. दहाएक मिनिटांनी राघूचा फोन वाजला. त्यानं तो फोन घेतला, पलीकडून कुणीतरी काहीतरी बोललं अन् राघूनं थरथरत्या हातांनी फोन बनेला दिला. कुणाचा फोन असं बनेनं प्रश्नार्थक चेहऱ्यानं विचारलं तेव्हा राघूनंही तूच बघ असं खुणावून सांगितलं. बनेनं फोन कानाला लावत घाबरत घाबरत हॅलो म्हटलं.

"मिस्टर बनेश्वर बल्लाळ उर्फ भास्कर बने, मी रसिका राजे बोलते आहे." हे ऐकल्याबरोबर बने ताडकन् उठून उभा झाला.

"मिस्टर बने, तुम्ही अभिनय चांगला करता, पण अजून बरेच कच्चे आहात. तुमची बनवेगिरी मी कालच ओळखली होती, तुमच्या स्पर्शातून. खरंतर कालच मी तुमचं सोंग उघडकीला आणू शकले असते, पण म्हटलं ह्यांना ह्यांच्याच पद्धतीने धडा शिकवावा. म्हणून तुमच्याच घरी येऊन तुमच्या नाटकावर पडदा पाडला."

"आँ ऽ पण तुम्ही तर माझ्या घरी आलाच नाहीत-"

त्या अवस्थेतही बन्या बोलून गेला अन् तिकडून खदखदा हसत रसिका म्हणाली,

"भले शाब्बास! अहो मग स्वतःच्या हातानं तुमच्या डोक्यावरचा विग ओढून काढणारी माझी आई म्हणून आलेली दुसरी कोण होती?"

आता मात्र बनेची वाचाच बसली. पण अजून एक धक्का बाकी होता.

"आणि मिस्टर बने, ज्यांच्या तुम्ही एवढ्या गयावया केल्या, ज्यांच्यासमोर कान धरून उठाबशा काढल्या, ते तरी खरे पोलीसवाले कुठे होते? तेही आमचेच कलाकार."

रसिका खदखदा हसत म्हणाली आणि मघाशी भितीनं पांढरा पडलेला बनेचा चेहरा आता शरमेनं काळाठिक्कर पडला.



## सनविवि विशेषांक विनोदी कथालेखन स्पर्धा २०२१ द्वितीय पारितोषिक - अविनाश चिंचवडकर

## माझी दीक्षितगिरी !

खरं तर माझं वजन इतकं जास्त असेल याची मला कल्पनाही नव्हती. पण सहज एकदा डॉक्टरकडे नियमित तपासणीसाठी गेलो काय आणि त्यांनी माझं वजन तपासले, तेव्हाच कळले! डॉक्टरांनी गंभीरपणे वजनकाट्याकडे बघितले आणि मान हलवून म्हणाले, "गॉन केस!"

मी हादरलोच. मी विचारले,"डॉक्टर, काय झाले?"

"वजन फार वाढले आहे. या वेगाने वजन वाढत राहिले तर तुमची स्थिती 'वाढता वाढता वाढे, भेदिले सूर्यमंडळा अशी होईल'". डॉक्टर फारच विनोदी! त्यामुळे संधी मिळताच विनोद करत.

"बापरे! काय सांगताय डॉक्टर? आता काय करायचे?" मी घाबरून म्हणालो.

"काही नाही, भरपूर सलाद खा, हिरव्या भाज्या खा" डॉक्टर म्हणाले.

"नक्कीच खाईल, पण डॉक्टर जेवणाच्या आधी खायचे की नंतर?" मी विचारले.

"जेवणाच्या ऐवजी!" डॉक्टर शांतपणे म्हणाले.

आता मात्र मी हादरलो. खाणं म्हणजे माझा वीक पॉईंट! चमचमीत आणि गोड पदार्थ खाणे हा माझा आवडता छंद! पण आता हे सलाद, हिरव्या भाज्या खाणं म्हणजे मोठेच संकट ! माणूसही जर पालापाचोळा खाऊ लागला तर चार पायांच्या प्राण्यांनी काय खायचे? आणि मग आपल्यात आणि त्यांच्यात काय फरक राहिला ? याच विचारात घरी आलो.

माझा पडलेला चेहरा पाहून (तो नेहमीच पडलेला असतो असे बायको म्हणते) आई म्हणाली," का रे, असा चेहरा का पडलाय? काय म्हणाले डॉक्टर?"

"असं वाटतंय की तुम्ही सलमान खानचा राधे पाहिला की काय?" मुलगी गमतीने म्हणाली.

तेवढ्यात बायको इथे आली आणि मी काय बोलतो याकडे लक्ष देऊन ऐकू लागली.

"काही नाही, माझं वजन वाढलंय, असं डॉक्टर म्हणाले. डायबिटीस, बीपी काहीही होऊ शकतं" मी गंभीरपणे म्हणालो.

"वाढणार नाही तर काय? रोज संध्याकाळी चमचमीत समोसे, बटाटेवडे खायची सवय लावून ठेवली आहे ना?" आईकडे रागाने पाहत बायको म्हणाली. सासूवर वार करण्याची एकही संधी ती सोडत नसे.

"आणि तू काय त्याला खूप चांगले जेवायला देतेस? तेलकट भाज्या, तेल लावलेल्या पोळ्या आणि पाणचट वरण"आई पण माघार घेणार नव्हती.

"आणि पुन्हा बाबांना दर एक तासाने चहा लागतो" मुलीने पण आगीत तेल ओतले.

"अरे बस करा! तुम्हाला काही वेळ काळ आहे की नाही? इथे माझा जीव धोक्यात आहे आणि तुम्ही आपसात भांडत आहात" मी वैतागलो.

"मग आता काय करणार आहेस तू?" आईने काळजीने विचारले.
"काहीतरी करावेच लागेल. पहिले तेलकट खाणे बंद" मी म्हणालो.
"बाबा तुम्ही मी जाते ते जिम लावा! ट्रेडमिल, झुंबा, वेट ट्रेनिंग करा" मुलगी उत्साहाने म्हणाली.
"अगं ते एवढे कठीण व्यायाम मला जमणार नाही. आणि मी झुंबा केला तर लोकं थांबा म्हणतील" मी माफक विनोद केला.
"काही कर बाबा, पण खाण्याची आबाळ करु नकोस" आई म्हणाली.
"अहो, तुम्ही ते दीक्षित डायट का करत नाही? आजकाल खूप लोक करतात आणि त्याने खूप जणांना फायदा झाला आहे" बायको म्हणाली.
"मी पण ऐकले आहे त्याबद्दल! पण कसं करायचं?" मी विचारले.
"काहीच विशेष नाही. फक्त दोनदाच जेवायचे आणि दोन जेवणामध्ये आठ तासाचे अंतर ठेवायचे" बायको म्हणाली.
"दोन जेवणांच्या मध्ये काही चालतं का?" मी आशाळभूपणे विचारले.
"हो, चालतं ना" बायको.
"काय काय चालतं?" मी उत्साहाने विचारले.
"पाणी, ताक, बिन दुधाचा चहा" बायको थंडपणे.
माझा चेहरा अजूनच पडतो.
आई रागावून म्हणते," हे काय मेलं खाणं झालं?".

दुसरा दिवस उजाडला आणि माझी दीक्षितगिरी सुरु झाली. बायकोला बजावल्याप्रमाणे तिने बिनदुधाचा काळा चहा करून दिला. तो पिऊन मला सकाळी सकाळीच तारे दिसले! या काळ्याशार पेयाला जर चहा म्हणायचे, तर मग विष कशाला म्हणायचे? हाच मूलभूत प्रश्न मला पडला.
पण मी माघार घेतली नाही. माझा दीक्षितगिरी करण्याचा निश्चय अतूट होता. दुपारच्या जेवणापर्यंत चांगलीच भूक लागली. सकाळपासून काहीच न खाल्ल्यामुळे पोटात कावळे (हल्ली कावळे कुठे दिसत नसले तरी पोटात बरोबर असतात) ओरडायला लागले. जेवणाच्या टेबलवर बसलो आणि बायकोने ताट समोर ठेवले. त्यात पाहिले तर धक्काच बसला.
"अग चुकून तू मला कमी वाढले आहे" मी म्हणालो. "नाही ते तुमचेच ताट आहे" ती म्हणाली.
मी ताटात पाहिले तर एक पोळी, थोडी भाजी, एक वाटी वरण आणि भरपूर काकड्या टमाटे!
"अग पण, यात माझे पोट कसे भरणार?" मी विचारले
"आता भरावंच लागेल! दीक्षित डायट करणार आहात ना ? त्यात एवढंच चालतं" बायको खवचटपणे म्हणाली. पण मी डगमगलो नाही. ते जेवण कसेबसे संपवले आणि कामाला लागलो. पण दुपारपर्यंत पोटातील कावळे डबलस्पीडने ओरडू लागले.

घरून काम करण्याचे अनेक फायदे आहेत. त्यातला एक महत्त्वाचा फायदा म्हणजे किचन मध्ये जाऊन कुठल्याही पदार्थावर डल्ला मारू शकतो. गेल्या काही महिन्यांपासून घरून काम केल्यामुळे ही सवय अधिकच बळावली होती. पण आता मात्र खाण्याचेच वांधे झाले होते.
संध्याकाळच्या जेवणाची वाट पाहत तो दिवस कसाबसा काढला. संध्याकाळच्या जेवणावर मात्र राक्षसासारखा तुटून पडलो. तरीही पोटाचा निम्मा भाग रिकामा असल्यासारखेच वाटत होते. पाणी तरी किती पिणार?

काही दिवस असेच गेले. खूप भूक लागली असताना एखादा पदार्थ दिसला तर तो खाण्याचा खूप मोह होई. पण मी तो टाळायचा प्रयत्न करीत असे.  काहीकाही प्रसंग तर परीक्षा पाहणारेच होते. उदाहरणार्थ मुलीचा वाढदिवस होता. त्यानिमित्ताने मस्त केक, समोसे आणले होते. इतर सर्व जण त्यावर डल्ला मारत असताना, आपण काहीच खाऊ शकत नाही या विचाराने जीव कासावीस होत होता.

जेवणाबरोबर रोज सकाळी उठून फिरायला जाण्याची पण बायकोने सक्ती केली. रोज सकाळी साखरझोपेतून उठून फिरायला जाण्याची कल्पना तेवढी काही सुखावह नव्हती, पण मी हळूहळू स्वतःला सवय करून घेतली.  पण या सकाळच्या रपेटीचे अनेक फायदे झालेत. आपल्या अपार्टमेंटमध्ये इतक्या देखण्या स्त्रिया राहतात याची मला कल्पनाच नव्हती. त्यामुळे पायापेक्षा डोळ्यांनाच जास्त व्यायाम मिळू लागला. या सगळ्या लावण्यवती दिवसभर कुठे गायब होतात आणि या आधी मला का दिसल्या नाहीत हाच प्रश्न मला पडला. पण सकाळी मात्र त्यांचे हमखास दर्शन होऊ लागले.

बाजूच्या ब्लॉकमधील मिसेस मल्होत्रा तर चक्क माझ्याकडे बघून हसल्यात. ते पाहून मला आधी खरेच वाटले नाही. पण मग हळूहळू मी पण त्यांच्याकडे बघून हसू लागलो. हळूहळू त्या मग थोडे बोलू पण लागल्यात. बोलताना केस बाजूला करण्याची त्यांची लकब खूपच मोहक होती. त्यामुळे एक फायदा झाला की मी सकाळी न चुकता लवकर फिरायला जाऊ लागलो. मिसेस मल्होत्रा दिसल्या नाहीत की जीव थोडा कासाविस व्हायचा.त्या माझ्याकडे बघून हसल्या की मग दिवस चांगला जायचा.रोज नियमितपणे फिरायला गेल्यामुळे माझी वजनही कमी झाले आणि मला जरा तरतरीत वाटू लागले. मी चांगले टी-शर्ट घालू लागल्यामुळे थोडा स्मार्ट पण दिसू लागलो.(असे एकदा मिसेस मल्होत्राच म्हणाल्या)

त्यामुळे झाले असे की हळूहळू बायकोला संशय येऊ लागला. माझ्या सारखा इतका आळशी माणूस रोज सकाळी उठून, न चुकता कसा काय फिरायला जातो? याचेच तिला आश्चर्य वाटू लागले. कधीकधी ती मला म्हणायची," अहो झोपा थोडावेळ. आज रविवार आहे. एखादा दिवस नाही गेलं फिरायला तरी  चालतं"

"नको, नको," मी म्हणायचो,"रोज फिरायला जायलाच पाहिजे. डॉक्टर दीक्षितांनी सांगितले आहे". मनात धास्ती वाटायची की मिसेस मल्होत्राची चुकामूक व्हायला नको.

बायकोचा संशय मात्र वाढतच गेला. एक दिवस सकाळी मी झोपून उठलो तर ती माझ्या आधीच उठून बसली होती. मला आश्चर्यच वाटलं.
"इतक्या लवकर का उठलीस? बरं नाही का ?" मी विचारले.
"बरं नसायला काय झालं? आज मी पण तुमच्या सोबत फिरायला येणार आहे" ती म्हणाली.
"अग पण कशाला? बाहेर खूप थंडी आहे" मी म्हणालो. "थंडीचे स्वेटर मी काढूनच ठेवले आहे" ती मिळाली. तिचा निश्चय पक्का दिसत होता. बहुधा तिला काहीतरी संशय आला असावा.

नाईलाजाने मी तिच्यासोबत पाय ओढत नेहमीच्या पार्कमध्ये फिरायला गेलो. बायको फेऱ्या मारू लागली आणि मी थोडा व्यायाम करू लागलो. तेवढ्यात नेहमीप्रमाणे मिसेस मल्होत्रा तिथे आल्यात. माझ्याकडे पाहून सुंदर हसल्यात आणि म्हणाल्या"आज उशीर झाला तुम्हाला?"
"नाही, मी वेळेवर निघणारच होतो, पण आज एक अनपेक्षित संकट ओढवले!" मी गांगरून म्हणालो.
"संकट! कसले संकट?" त्या प्रश्नार्थक चेहऱ्याने म्हणाल्या.
मी मनात म्हणालो," कळेलच तुम्हाला आता ते"
मी त्यांच्याशी बोलत होतो तेवढ्यात बायको तिथे येऊन थडकलीच. तिला पाहून मिसेस मल्होत्रा भूत पाहिल्यासारखा दचकल्यात. काहीतरी जुजबी बोलून त्या फिरायला निघून गेल्यात.

घरी परतल्यावर बायकोने एकदम रुद्रावतार धारण केला. "काय बोलत होता त्या बाईशी?" ती म्हणाली.
"काहीच नाही ! त्या तुझ्याबद्दलच विचारत होत्या" मी म्हणालो.
"मला काय मूर्ख समजलात की काय तुम्ही? मला कळत नाही होय तुमचे धंदे?" ती कडाडली.
"काय बोलतेस तू? कसले धंदे?" मी गांगरून म्हणालो.
"तरी मला वाटलंच होतं की इतक्या सकाळी उठून, न चुकता फिरायला कसे काय जाता? त्या सटवीशी गुलुगुलु गप्पा करायला मारायला जात असाल?" ती म्हणाली.
"अगं तसं काहीच नाही. तुझा गैरसमज होतो आहे" मी गयावया करीत म्हणालो.
"ते काही नाही. उद्यापासून फिरायला जाणे बंद" ती ठामपणे म्हणाली.
" अग पण ते दीक्षित डायट?" मी कसाबसा बोललो.
"काही नको ते डायट बिएट ! आता मी तुम्हाला काहीच वेगळे खायला देणार नाही. आज पासून तुमचं दीक्षित डायट बंद!" ती निर्णायक स्वरात म्हणाली.

आजकाल मी घरातच थोडा योगाभ्यास करतो.खिडकीचे पडदे उघडून मिसेस मल्होत्रा कुठे दिसतात का याचा अंदाज घेतो. पण बायकोची माझ्यावर करडी नजर असते. ती लगेचच पडदे बंद करते. अशाप्रकारे दुर्दैवाने माझी दीक्षितगिरी अचानकच संपुष्टात आली !

(ही कथा केवळ गंमत म्हणून लिहिली आहे. दीक्षित डाएटचा अनेकांना फायदा झाला असून माझा पण त्यावर द्रुढ विश्वास आहे. त्यामुळे ही कथा जास्त गंभीरपणे घेऊ नये, हीच नम्र विनंती)

अविनाश चिंचवडकर
बेंगळूरु
avinashsc@yahoo.com
M - 9986196940

**WITH**
**BEST COMPLIMENTS**
**FROM**

**Sameer Bhagwat**

WITH BEST COMPLIMENTS

FROM

## FRAGRANZ INDIA PERFUMES PVT LTD.,

Where your Fragrance and Flavour concepts
Are crystalised

Manufacturers of
Perfumes for

SOAP, COSMETICS,AGARBATHIES, TOBACCO ETC:

FLAVOURS FOR

BISCUITS, CONFECTIONERY, PHARMACEUTICALS, SYRUPS ETC

NO.7, MALLASANDRA
HESARGHATTA ROAD
DASARAHALLI POST
BANGALORE – 560 057

Ph: 080 29597353
080 29597352



WITH BEST COMPLIMENTS

FROM

## AROMATIK BANGALORE PVT LTD.,

Where your Fragrance and Flavour concepts
Are crystalised

Manufacturers of
Perfumes for

SOAP, COSMETICS,AGARBATHIES, TOBACCO ETC:

**FLAVOURS AND FOOD COLOURS FOR BAKERY,BISCUITS, CONFECTIONERY, PHARMACEUTICALS, SOFT DRINKS, SYRUPS ETC**

NO.5, CHIKKASANDRA
HESARGHATTA ROAD
DASARAHALLI POST
BANGALORE – 560 057

PH: 091-080 28397352
Ph: 080 – 28395799
email: aromatik1954@gmail.com

## सनविवि मुखपृष्ठ, चारोळी व हायकू स्पर्धेचे निकाल आणि परीक्षकाचे मनोगत

मी , आरती फडके .

पेशाने इंजिनीरिंग कॉलेज मध्ये प्रोफेसर आहे तरीही मनातील विचार व सहज भावनांना वाट करून देताना मी कधी चित्र काढते तर कधी शब्दांना संगती घेऊन कवितेतून व्यक्त होते.

आयुष्याच्या वाटचालीत अभिव्यक्ती साठी सापडलेले माध्यम इतकेच त्या छंदाकडे मी पाहत होते. पण हे हाती घेतलेले माध्यम मला इतक्या वेगळ्या पद्धतीने भेटेल असे ध्यानी मनी नव्हते.

आज सौ माणिक पटवर्धन यांच्या ह्या विनंतीमधून एक खजिनाच मला सापडला असे मला वाटले.

हा ठेवा फक्त काढलेल्या चित्रांचा किंवा शब्द कणिकांचा नाही, तर माझ्या सारख्या कितीतरी जणांच्या अभिव्यक्तीचा!

दिवसभराच्या इतर व्यापातून वेळ काढून कोणी जेंव्हा रंग रेषेतून स्वप्न बघते, किंवा शब्दांतून व्यक्त होते तेंव्हा त्या व्यक्तीचा वेळ तर मजेत जातोच, पण तो देऊन जातो एक ऊर्जा वाचकालाही ! आणि मग ज्योत से ज्योत जगाते चलो या तत्वाने फुलते एक संस्कृती!

तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करून, भोवतालच्या कठीण परिस्थितीत देखील ही ज्योत तेवती ठेवणाऱ्या तुम्हा सर्वांना माझा मनापासून सलाम आणि अशा अभिव्यक्तीने परिपूर्ण अशा आपल्या मासिकाला माझ्या खूप खूप शुभेच्छा !

आरती फडके
ठाणे

**मुखपृष्ठ स्पर्धा निकाल:**

प्रथम क्रमांक - अंजली देशमुख (मुखपृष्ठ)
द्वितीय क्रमांक - सुनील टाके
तृतीय क्रमांक - अंजना घैसास
(विभागून) - वैभवी शिंपी.

**चारोळी स्पर्धा निकाल:**

प्रथम क्रमांक : मानसी तांबेकर
द्वितीय क्रमांक : स्मिता दाते
तृतीय क्रमांक : अंजना घैसास

**हायकू स्पर्धा निकाल:**

प्रथम क्रमांक : देवश्री
द्वितीय क्रमांक : मानसी तांबेकर

# विनोदी चारोळ्या

## सनविवि विशेषांक चारोळी स्पर्धा २०२१ प्रथम पारितोषिक - मानसी तांबेकर

1. आमच्या ह्यांनी लावला नृत्याचा क्लास
   त्यांची थिरकती पाऊले बघून झाले सगळे चकित
   पण ते कशाला जगाला सांगतात की
   'बायकोच्या तालावर नाचतो' हेच आहे याचं गुपित.

2. वजन कमी करण्याचा घेतला आहे मी वसा
   दीक्षित, दिवेकर डाएटचा पूर्ण केला Study
   पण बाहेर पाऊस पडला की
   चहा आणि भजी यासाठी जीभ असतं सदैव Ready.

3. पुणेरी पाट्यांचा भलताच रंग
   प्रेमी युगुलांना केला इशारा
   बागेतील प्रवेशासाठी लावले निर्बंध
   'दुपारी एक ते चार भावनांना आवरा'

मानसी गजानन तांबेकर
Mobile No. 9980700711

## सनविवि विशेषांक चारोळी  स्पर्ध २०२१ द्वितीय पारितोषिक - स्मिता दाते

3. नवरा बायकोच्या भांडणात
   पडत नसतो शहाणा,
   कंटाळा घालवायलाही भांडू शकतात
   पुरतो कुठलाही बहाणा...!

4. व्यायाम करू जाता वाटे
   ठेवू तोंडावर ताबा,
   भुकेच्या वेळी नेमका दिसे
   फरसाणाचा डबा..!

3. आमच्या हीच्या नखाची सर
   कोण्णा कोण्णाला नाही...
   वाद घालणारा होई बेचिराख,
   हिला बुलडोझर शरण जाई!

- स्मिता दाते

## सनविवि विशेषांक चारोळी स्पर्धा २०२१ तृतीय पारितोषिक - अंजना घैसास

### चारोळी

१) म्हणे, त्याला हवी होती

एक मधुबाला

मिळाली एक शिक्षिका

नी घराची झाली पाठशाला

२) टकलावर तेल फासतांना

चुकूनी खाली ते ओथंबले

मनापर्यंत पोहोचता

म्हातारे म्हणे हिरवटले

३) एक नाजुकशी बारीक युवती

सागरतीरी फिराया गेली

तिकडून आला वारा

नी ती सरसर आकाशी उडाली

**सौ. अजंना घैसास**



## सनविवि विशेषांक हायकू स्पर्धा २०२१ प्रथम पारितोषिक - देवश्री अंभईकर धरणगांवकर

1. कामांची घाई
   गावाहून येताना
   स्मरते आई

2. मनात मन
   अलगद गुंतले
   बंध तुटले

3. श्रावण सरी
   मोरपिसांत खुले
   सावळा हरी

4. झुरते राधा
   रासक्रीडेत दंग
   तिचा श्रीरंग

5. थोडे रुसावे
   कुणीतरी असावे
   अश्रू पुसावे

6. मलीन वाट
   सोडता सोडवेना
   तोच तो घाट

7. मनाची कुपी
   सुगंध मनभर
   स्मृती-अत्तर

- देवश्री अंभईकर धरणगांवकर

## सनविवि विशेषांक हायकू स्पर्धा २०२१ द्वितीय पारितोषिक - मानसी तांबेकर

### हायकू कविता

1. फुलाचा गंध
   भ्रमराला लागला
   मैत्रीचा छंद

2. पालापाचोळा
   आठवणी झाल्या गोळा
   मन मोकळं

3. इंद्रधनुष्य
   नभ रंगानी सजले
   भाग्य खुलले

4. शांत किनारा
   वादळाची चाहूल
   थांब पामरा

5. ओठात गाणी
   तू माझ्या ध्यानी-मनी
   सहचारिणी

मानसी गजानन तांबेकर
Mobile No. 9980700711

# गणपतीची स्तुति

**(*सुधाकरी अभंग काव्यरचना*)**

तू असशी दाता । तूच विघ्नहर्ता।
तूच सृष्टीकर्ता। गौरीसुता ।।

उदर लंब तुझे । मुखी एक दंत ।
नमू वक्रतुंडा ।तूज नीत ।।

ओंकार स्वरूप।असे तुझे रूप।
व्यापूनी विश्वा,तू। विश्वरूप ।।

हरसी रे चिंता। सकल जनांच्या ।
कामना भक्तांच्या। पुरविसी।।

उत्पत्ती, विलय। तूच करवशी ।
सृष्टीचा रे कर्ता । तू असशी ।।

ब्रह्मा तू,विष्णू तू। रूद्र ही तूच तू ।।
अग्नी तू, वायू तू । गजानना ।।

सूर्य तू, चंद्र तू । वरूण रे तूच ।
इंद्र तोही तूच । हे गणेशा ।।

हे गणनायका । हे गजवदना ।
दे आशिर्वचना ।आम्हा देवा ।।

रेवती कुलकर्णी , बंगळुरु.

## सुधाकरी अभंग रचनेविषयी थोडेसे!

सुधाकरी अभंग रचनेसाठी नियमावली व रूढ संकेत -*

(१) *आपल्या देवतेशी आर्त व हृद्य संवाद* - हा या काव्यप्रकाराचा आत्मा आहे.

(२) *प्रत्येक कडवे / चरण हे चार ओळींचे असते.* पहिल्या ओळीत ६ अक्षरे, दुस-या ओळीत ६ अक्षरे, तिस-या ओळीत ६ अक्षरे व चौथ्या ओळीत ४ अक्षरे असतात. *(६,६,६,४)*

(३) *यमक* दुस-या व तिस-या ओळीच्या शेवटी. किंवा दुस-या व चौथ्या ओळीअंती. जर सर्वच चार ओळींअंती यमक जुळवले तर त्यास सुवर्ण सुधाकरी अभंगरचना" म्हणतात.

(४) *कडव्यांची संख्या* ५ ते ८ पर्यंत असावी.

(५) *रचनेचा विषय* एका / पहिल्या चरणात यावा.

(६) अजरामर अशी

*विठू माऊली तू*
*माऊली जगाची*
*माऊलीत मूर्ती*
*विठ्ठलाची*

ही सुधाकरी अभंग काव्यरचना अहे.

(७) कडव्यामध्ये

*६*
*६*
*६*
*४*

असे लिहिण्याऐवजी, जागा वाचवण्यासाठी व रचना आटोपशीर दिसावी म्हणून

*६ ६*
*६ ४*

असेही लिहिण्यात येते.



## गणपतीस पत्र

माझ्या लाडक्या बाप्पा,
साष्टांग दंडवत!

कसा आहेस रे बाप्पा, नाराज आहेस का आमच्यावर ?
मध्यंतरी वाचनात आले की तू ह्यावर्षी खूष असशील म्हणून !
मोठ्या मोठ्या मूर्ति नाहीत, मोठमोठ्या सजावटी नाहीत, डिजेंचा ढणढणाट नाही, सेलिब्रिटींसाठी
गर्दी नाही, दर्शन रांगा नाहीत, वाहतूकीचा खोळांबा नाही, विसर्जनाच्या मिरवणूका आणि
मूर्तिची विटंबना नाही म्हणून तू खुश आहेस म्हणे!
अगदी बरोबर आहे, पण आम्ही सामान्यजन तुला खूप मिस करू!

सार्वजनिक गणपतींचे एक जाऊ दे. पण ह्या कोरोनामुळे आम्ही घरातही मनासारखे सजवू शकणार नाही तुझे मखर!
तुझा उत्सव म्हणजे नातेवाईक मित्रमंडळी ह्यांना एकत्र जमवणारा, नाती परत सांधणारा असा मनामनात चैतन्य
जागवणारा उत्सव!आता कोणी कोणाकडे जाऊ शकणार नाही, आरत्यांचा नाद घुमणार नाही, झांजा, डफ
तडतडणार नाहीत, सारे कसे शांततेत पार पडेल!
मुंबईतल्या चाकरमान्यांचा सगळ्यात मोठा सण हा! कोकणात आपल्या माणसात जाऊन साजरा करण्यासाठी वर्षभर वाट पहातात, जाण्यासाठी पैसे जमवतात, त्यांचा तर मोठा हिरमोड होईल रे!

आम्ही सगळे भक्तजन तुला साकडे घालतोय, नको ना रे रागावू इतका तुझ्या भक्तमंडळींवर.
घालव रे हे कोरोनाचे संकट आता! विघ्नहर्ता म्हणतात ना तुला?
मग कर ना रे हे विघ्न दूर! आमच्या सगळ्या चूका पदरात घे आणि सगळे पूर्वीसारखे होऊ दे रे महाराजा!
तुला मोदकांचा नैवेद्य आवडतोना? तू मागशील तितके देऊ तुला पण हे कोरोनाचे विघ्न तेवढे दूर कर आता!
ऐकशील ना रे?

तुझी कृपाभिलाषी ,
सगळी भक्तमंडळी!

रेवती कुलकर्णी , बंगळुरु

# पालवी

खूप दिवसांपासून बाल्कनी गार्डनिंग करायचा विचार चालू होता. नवीन घरी शिफ्ट होऊन वर्ष होऊन गेले तरी कोविड मुळे काही एखाद्या नर्सरी मध्ये जाऊन रोपे आणणे शक्य होत नव्हते. म्हणून मग मागच्या महिन्यात शेवटी ऑनलाईनच काही रोपे ऑर्डर केली. तुळस, कढीपत्ता, मोगरा आणि माझ्या आवडीचा चाफा, अशी काही रोपे ऑर्डर केली. त्यांचे करकचून बांधून केलेले पॅकिंग बघून मला कसे तरीच झाले. पटकन उघडून  पाहिले तर चाफा सोडून बाकी रोपे बऱ्याच बऱ्या अवस्थेत होती. पटकन त्यांना बाल्कनी मध्ये दुसऱ्या कुंड्यांमध्ये सेट केले. सगळी रोपे मोकळ्या हवेत, सूर्यप्रकाशात आनंदाने डोलू लागली. जणू त्यांना नवा श्वासच मिळाला होता..पण चाफ्याचे रोप मात्र खूपच उंच वाढलेले. अगदी टोकावर मोजून फक्त चार पाने आणि त्यातली सुद्धा दोन पाने वाळून गेलेली. त्याला मोठ्या कुंडीत शिफ्ट केले. वेळेवर पाणी घालत राहिले. विचार केला, येईल ...मुळे आहेत ना...हे रोप छान येईल, नाही जळून जाणार. चार पाच दिवसांनी चाफा सोडून बाकीची रोपे मस्त टुमदार डौलदार दिसत होती. आनंदाने नाचू बागडू लागली होती. पण चाफा..त्याची तर ती चार पाने पण पूर्णपणे वाळून गेली होती. मला खूप वाईट वाटले. एकतर पहिल्यांदाच मी असे खूप हौसेने चाफ्याचे रोप घरी लावले होते, तेही ऑनलाईन ऑर्डर करून.

घरातली मंडळी म्हणाली सुद्धा, "अगं हा चाफा तर पूर्णपणे जळून गेला, बहुतेक नाही येणार आता. मलाही तसेच वाटू लागले, सगळी पाने गेली नुसतीच लांब काठी कुंडीत कितीतरी दिवस दिसत होती....




रोज मी त्याला थोडेसे पाणी घालायचे आणि तिथे थांबून म्हणायचे ..."नाही..असे नाही होणार ..चाफा येणारच, मी इतका मनापासून आणलाय तो..इतक्या प्रेमाने लावलाय..तो येईलच...". आणि आज, साधारण एक महिन्या नंतर, माझ्या जन्मदिनी, नेहमी प्रमाणे मी बाल्कनी मध्ये गेले आणि पाहते तर काय, माझ्या चाफ्याला शेवटी पालवी फुटली. बघून आनंद अगदी गगनात मावेनासा झाला...इतके दिवस मी आशा सोडली नाही.. आणि जणू त्याने मला आज आशेचा किरण दाखवला .मी जशी जिद्दी तसाच तो ही जिद्दी..असेच काहीतरी वाटले.

"हे घे तुझ्या वाढदिवसाची भेट" असेच काही जणू माझा चाफा बोलला....!!!!   :)

- वैशाली चौधरी

## सनविवि विशेषांक चित्रकला स्पर्ध २०२१ द्वितीय पारितोषिक - सुनील टाके



## सनविवि विशेषांक चित्रकला स्पर्ध २०२१ प्रथम तृतीय पारितोषिक - अंजना घैसास



## सनविवि विशेषांक चित्रकला स्पर्धा २०२१ प्रथम तृतीय पारितोषिक - वैभवी शिंपी



## SWAKRUTA CHARITABLE TRUST (R)

### A FORUM OF WOMEN ENTREPRENEURS

SWAKRUTA
CHARITABLE TRUST

Swakruta provides a platform and supports home-based businesses managed by women.

We promote entrepreneurship and empower women to help them establish their businesses with training, networking and knowledge sharing on business processes.

**For Details and Registration contact - 9945122147, 9880052860**



## WAY 2 WED

MATRIMONIAL SERVICES

SINCE 2004

## बेंगळुरू मधील एकमेव मराठी विवाहसंस्था

**आमची वैशिष्ट्ये :**

- दर महिन्यात एकदा ऑनलाईन मेळावा.
- महाराष्ट्रातील विवाह मंडळाशी सहयोग.
- विवाह समुपदेशक, ज्योतिष शास्त्रातील अभ्यासकांचे मेळाव्यात मार्गदर्शन.
- उच्च शिक्षित, उच्च आर्थिक स्थरातील प्रोफाईल्स.
- वैयक्तिक संवाद.

**संपर्क :**

माणिक पटवर्धन : 9886046987

स्मिता बर्वे : 8310684369

आरती माहुली : 9880155312

रेवती कुलकर्णी : 9819520117



उच्च शिक्षण झाले, मना सारखी नोकरी मिळाली
आता पुढचं पाऊल ....
चहाच्या घोटाबरोबर आयुष्याची रंगत वाढण्यासाठी
जोडीदार हवाच !
मग वाट कसली बघता ?
आजच रजिस्टर करा.



WITH BEST COMPLIMENTS FROM

# TARANG ENGINEERING PVT. LTD.

NAGPUR

MANUFACTURERS OF

RADIATORS FOR POWER AND DISTRIBUTION

TRANSFORMERS



ISO 9001: 2015


(Certified & Approved by IRQS)

| | | |
|---|---|---|
| Regd. Office | : | TARANG ENGINEERING PVT.LTD.<br>23 I.D.A., Balanagar,<br>Hyderabad- 500037. |
| Phone | : | (040) 44540111. |
| Fax | : | (040) 23078400. |
| Email | : | ho@petarang.com |
| Website | : | www.petarang.com |

| | | |
|---|---|---|
| Works | : | TARANG ENGINEERING PVT. LTD.<br>A-26/5/1, M.I.D.C., Butibori Industrial Area,<br>Butibori, Nagpur- 441122. |
| Phone | : | (07104) 265440, 265450 |
| Fax | : | (07104) 265449. |
| Email | : | tarang@petarang.com |
| Website | : | www.petarang.com |







OPUS
ARCHITECTS




Ar.SUJAY GHORPADKAR
(Architect Principal)

118,7TH CROSS,3RD MAIN DOLLARS COLONY,
R.M.V. EXTENSION 2ND STAGE,
BANGALORE - 560 094. INDIA

T:+91-80-23417646
E:sujay@opus-architects.com
E:anagha@vyuhana.com
W:www.opus-architects.com
W:www.vyuhana.com

Ar. SUJAY GHORPADKAR
ANAGHA GHORPADKAR
(MANAGING DIRECTOR & CEO)

VYUHANA®
PRIVATE LIMITED




# पद्माकर जावडेकर

# माधुरी नागानंद

**भरघोस आर्थिक सहाय्यबद्दल मनःपूर्वक आभार!**

**लोभ आहेच! वृद्धिंगत व्हावा ही सदिच्छा!**

## धन्यवाद